# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २४/०६/२००४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक २४/०६/२००४ रोजी सभा सुचना क्र. ०६ दि. १८/०६/२००४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### <u>उपस्थित सदस्य</u>

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | सदस्य |
| ४) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ५) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ६) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ७) | श्री. नितीन गोपीनाथ ठाकूर | सदस्य |
| ८) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ९) | श्री. दिनेश द. नलावडे | सदस्य |
| १०) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ११) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| १२) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | सदस्य |
| १३) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| १४) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |
| १५) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |

### <u>गैरहजर सदस्य</u>

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करून आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरूवात करावी.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ३३ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

स्मॉल स्केल आहे. त्याचा उल्लेख या ठिकाणी नाही आहे. त्यापासून निघणारा ओला कचरा, सुका कचरा, प्लॅस्टीक, काही केमिकल्स याचा उल्लेख याच्यामध्ये नाही आहे. स्लममध्ये काही ठिकाणी दुकाने आहेत, हॉटेल्स आहेत, फॅक्टरीज आहेत. त्याच्यातून आपण खाण्याच्या वस्तू बनवितो. त्याचा जो वेस्ट निघतो. त्याचा उल्लेख कुठे नाही आहे. त्यानंतर आपले जे नदीनाले वगैरे आहेत. त्याची लांबी रुंदी, खाड्या, आपल्या शहरातून जे नाले वगैरे जाणारे आहेत त्याच्या लांबी रुंदीमध्येसुद्धा फरक आहे. तर यामध्ये आता मच्छिमार्केट आहे. मच्छिमार्केटचा उल्लेख त्यापासून निघणारा कचरा किती? भाईंदर वेस्टला जास्त मटणाची दुकाने माझ्या वॉर्डमध्येच आहेत. याच्यापासून निघणारा ओला कचरा किती? हे त्या अहवालामध्ये नाही आहे. हा अहवाल आपण एकदा आहे त्या स्थितीत स्विकारला आणि जर त्याला मंजूरी दिली तर पुढे काय परिणाम होतील ते सर्व आपल्यावर शेकले

जाणार आहेत.  कारण या पर्यावरण अहवालावर पुढच्या काही दोन-तीन-चार वर्षाची परिस्थिती अवलंबून आहे.  सगळी आपली जी पुढची खर्चाची गणिते आहेत.  तेव्हा महानगरपालिकेने काय भूमिका घ्यायची आहे.  आज मी हे याच्याकरिता वक्तव्य करीत आहे की, आपली १७ तारखेला महासभा झाली. त्यानंतर आज जवळ जवळ एक महिना व्हायला आला.  पण त्याच्यानंतर प्रशासनाच्या वतीन आम्हांला दोन ओळीचे पत्रदेखील आलेले नाही की, पर्यावरणाबद्दल आपण काही सुचना असतील तर त्या सुचवाव्या किंवा आम्ही त्या अमुक अमुक पद्धतीने अमेन्ड करु.  हे खरे म्हणजे अहवाल बनायच्या अगोदरच आले पाहिजे होते.  तो कलर फर्स्ट क्लास प्रिंटींग होऊन आपल्याकडे आलेला आहे.  मी परत एकदा सांगतो आपण जे ग्रीन कोट क्लबला जेवढे उपस्थित होते त्यांनाच तो मिळालेला आहे. बाकीच्या सर्व नगरसेवकांना मिळालेला नाही.  तर तो अहवाल किती प्रतींमध्ये प्रिन्ट केला आहे? त्याचा खर्च किती आला आहे?  आणि त्यामधील ज्या त्रुटी राहिलेल्या आहेत त्याला कारणीभुत कोण? आपण जर इकडे एखादा सक्षम अधिकारी नेमलेला आहे.  कारण अधिकारी नेमताना तो एक्सपर्ट कसा आहे?  हे सगळे सांगत असतो आणि मग त्याची नियुक्ती होते.  मग त्याच्याकडून अशा चुका होतात का?  याचासुद्धा आपण सगळ्यांनी गांभीर्याने विचार केला पाहिजे.  कारण त्या मंजुरीला आपण सगळे जबाबदार राहणार आहोत.  उद्या पर्यावरणाला मंजुरी तर द्यावीच लागणार आहे.  पण एखादे होत असतांना सगळे चांगल्याने करावे, चांगला पर्यावरण अहवाल तयार व्हावा, साधकबाधक व्हावा.  होतील तेवढ्या त्रुटी त्याच्यात कमी रहाव्या ही माझी स्वतःची एक इच्छा आहे.  माझ्या वॉर्डचे मी तुम्हांला एक उदाहरण दिलेले आहे.  त्याच्यावर संबंधित अधिकाऱ्यांनी इकडे आम्हांला योग्य तो खुलासा करावा. नुसता खुलासा नाही तर त्याची पुर्तता कधी होईल ती बघा.  त्याला बंधनकारक हे अधिकारी राहतील आणि सब्जेक्ट टू कंन्डीशन आम्ही याला परवानगी देणार आहोत हेही लक्षात ठेवा.  त्यांच्या पापाचे भागीदार आम्ही नाही होणार.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, सभेला सुरुवात झाली.  परंतु, एक अभिनंदनाचा ठराव आहे.  मा. उपमहापौर मिरा भाईंदर महानगरपालिका आणि मिरा भाईंदर क्षेत्राचे गौरव म्हणून आपल्या मिरा भाईंदर क्षेत्राचे पहिले आमदार निवडून आलेले आहेत.  त्याबद्दलचा मी धन्यवादचा आणि अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**मोहन पाटील :-**

या ठरावला मी माझे अनुमोदन देत आहे आणि खरंच मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकासाच्या दृष्टीकोनातून आपल्यामध्ये नगरसेवक या नात्याने काम करणारे एक प्रतिनिधी हे आज राज्य शासनाचे प्रतिनिधी झालेले आहेत.  मिरा भाईंदरच्या विकासाच्या कामाला त्यांचाही हातभार लागेल आणि लागो आणि त्यांच्या पुढील कारकिर्दीस सुयश इच्छितो आणि सन्मा. सदस्या रिटा शाह यांनी मांडलेल्या ठरावास मी अनुमोदन देत आहे.

**ठराव क्र. ४० :-**

मा. श्री. मुझफ्फर हुसेन, उपमहापौर यांची विधान परिषदेवर आमदार म्हणून निवड झालेबाबत अभिनंदन ठराव मांडीत आहे.

**सुचक :-  श्रीम. रिटा शाह.                    अनुमोदन :-  श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**मा. स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**चंद्रकांत वैती :-**

या सभागृहातील कॉंग्रेस पक्षाचा गटनेता म्हणून सभागृहाला एक सुचना करतो की, या मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सदस्य आणि विद्यमान उपमहापौर श्री. मुझफ्फर हुसेन साहेब यांची आमदार पदी नियुक्ती झाली.  पण आपल्या सदनाचे सदस्य असल्यामुळे आपण एक विशेष सभा बोलावून महापालिकेच्या सभागृहात त्यांचा सत्कार लावावा अशी मी सुचना करतो.

**याकुब कुरेशी :-**

या सुचनेला माझे अनुमोदन आहे.

**नितीन ठाकूर :-**

त्याचबरोबर मी उपसुचना करतो की, जे उपसभापती वसंत डावखरे साहेब होते तेही निवडून आलेले आहेत. त्यांनाही बोलावून त्यांचाही समावेश करण्यांत यावा ही विनंती करतो.

**अनंत पाटील :-**

जर महापालिकेतर्फे सत्कार समारंभ ठेवायचा असेल तर लोकसभेचे प्रकाश परांजपे साहेब हे देखील निवडून आलेले आहेत. तर त्यांचादेखील सत्कार समारंभाचा यामध्ये समावेश करावा.

**मोहन पाटील :-**

सर्व पक्षीय असावा. कारण आपल्या विभागाचा विकास होणार आहे आणि आपल्या विभागाच्या विकासाचे शिल्पकार खासदार-आमदार हे असणार आहेत. म्हणून त्यांच्या सर्वांचा समावेश करुन सत्कार करावा असे मी आपल्याला सुचवित आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती महोदय, या विषयाला अनुसरुन बोलत आहे, आमच्या इथे जे झाडांसाठी खड्डे केलेले आहेत. रस्त्याच्या बाजूला जवळ जवळ चारशे खड्डे केलेले आहेत. अजूनपर्यन्त तिथे एकसुद्धा झाड लावलेले नाही.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, आता सन्मा. सदस्य जोजफ घोन्सालवीस यांनी विषय मांडला. उत्तन विभागामध्ये चारशे खड्डे खोदून परत बुजायला आले. त्याचे पैसे काही गेले असतील पण अजूनपर्यंत झाडे वगैरे काही लावलेली नाहीत. तर त्याचे कारण काय? आणि हा पर्यावरण स्थिती अहवाल याच्यामध्ये मला थोडेसे विचारायचे आहे की, आता जे सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब बोलत होते की, हा अहवाल बरोबर नाही. याच्यात काही समावेश नाही. तर मी पण असा थोडासा भ्रमित आहे. जो ग्रीन कोर्टमध्ये अहवाल दिला होता तो बहुतेक दुसरा अहवाल होता. कचऱ्याची विल्हेवाट कशी लावायची तोच बहुतेक अहवाल असला पाहिजे आणि ध्वनी प्रदुषण वगैरे आणि याच्यात दुसरे काहीतरी पर्यावरणामध्ये ज्या काही वस्तू येतात. झाडे कुठे लावायची? ध्वनी प्रदुषण जास्त कुठे आहे? वाहनाचा लोड जास्त कुठे आहे? हा सगळा अहवाल तयार करण्यासाठी हा प्रस्ताव आणलेला आहे की, दुसरे काय आहे?

**डॉ. बावस्कर :-**

मा. सभापती महोदय, आजचे जे मंजुरीसाठी प्रकरण आहे. ते पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल तयार करण्यासाठी ज्या निविदा मागविलेल्या होत्या त्या निविदेस मंजुरीसाठी आहे. आपण ग्रीन कोर्ट क्लबला जी कार्यशाळा घेतली होती. त्या कार्यशाळेमध्ये घनकचरा व्यवस्थापनाबद्दल जे मायक्रोप्लॅनिंग वॉर्डवाईस तयार केले होते. त्याचा ड्राफ्ट आपल्याला दिलेला आहे. तो रिपोर्ट फायनल नाही. हे काम डिपार्टमेंन्टने केलेले आहे. त्यावर एक पैसाही खर्च झालेला नाही. ते काम आपण आपल्या डिपार्टमेंटकडून करुन घेतलेले आहे. सगळे प्रिटींग, टायपिंगसुद्धा डिपार्टमेंन्टने केलेले आहे. त्यावर एक पैसा खर्च केलेला नाही. हा अहवाल कायद्याने आपल्याला मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमानुसार आयुक्तांना प्रत्येक वर्षी महानगरपालिकेला सादर करायचा असतो. यामध्ये एअर पोल्युशन, साऊंड लेव्हल त्याच्यानंतर वॉटर पोल्युशन. वॉटरमध्ये इंडस्ट्रीयल, ड्रीकिंग वॉटर, तळ्यातील पाणी, जमिनीचे सॅम्पल याचे घेऊन इथे ध्वनी प्रदुषण कुठल्या ठिकाणी जास्त होते? किंवा लेव्हल स्टँडर्डस् म्हणजे नॉर्मल लेव्हलपेक्षा किंवा स्टँडर्ड लेव्हलपेक्षा कमी आहेत की, जास्त आहेत याची माहिती घेणे आणि याचबरोबर पर्यावरणाच्या दृष्टीने ज्या ज्या गोष्टी महाराष्ट्र शासनाने पर्यावरण अहवालामध्ये सांगितलेल्या आहेत. त्या गोष्टीचा समावेश करुन हा पर्यावरण अहवाल जुलै महिन्यामध्ये मा. महासभेला सादर केला जाणार आहे. हा अहवाल यामध्ये तयार करायचा आहे. त्यासाठी या निविदा आहेत. आपल्या वर्कशॉपमध्ये जो ड्राफ्ट दिलेला आहे. त्याचा आणि याचा तसा संबंध नाही. तो अहवाल किंवा तो रिपोर्ट वेगळा होता. तो आपण प्रत्येकाला देणार आहोत आणि त्या दृष्टीने प्रत्येक वॉर्डमध्ये सभा लावण्यासाठी आपणा सर्वांना आम्ही पत्र पाठविलेले आहे आणि सर्वांचा विचार विनिमय झाल्यानंतर त्यावर करेक्शन करुन तो फायनल रिपोर्ट आम्ही आपल्याला पुन्हा सादर करु. तो वेगळा वॉर्डवाईस मायक्रोप्लॅनिंग घनकचरा व्यवस्थापनासाठी आहे आणि हे जे प्रकरण आहे ते पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल तयार करण्यासाठी बेसिकली साऊंन्ड पोल्युशन, एअर पोल्युशन, वॉटर पोल्युशन

या तीन गोष्टींमध्ये याचा समावेश होतो. याचे सॅम्पल घेणे, ते टेस्टिंग करणे आणि त्याचे रेकॉर्ड आपल्याला सादर करणे आणि पर्यावरण अहवाल तयार करणे, ड्राफ्ट रिपोर्ट करणे यासाठी ही निविदा आहे.

**दिनेश नलावडे :-**

सभापती महोदय, आपल्याला विषय क्र. ३ जो पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल तयार करण्याबाबत विषय आलेला आहे. मी या विषयी या ठिकाणी सुचना मांडू इच्छितो की, माझ्या प्रभागामध्ये चंदनपार्क कॉम्प्लेक्स आहे. त्या ठिकाणी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मार्फत किंवा नगरपरिषद असतांना त्या ठिकाणी झाडे लावलेली होती. वृक्षारोपण केलेले होते. त्या झाडांना मला वाटते तीन चार वर्षे झाली. झाडेदेखील फार मोठी झालेली होती आणि त्या ठिकाणी काही लोकांनी ती झाडे जाणून बुजून उपटून फेकून दिली. केळकर साहेब, ती झाडे काही लोकांनी उपटली आणि फेकून दिली आणि तिकडे साफ करुन टाकले. तिथे जाळ्या, खत. माती आणि वृक्षारोपण नगरपालिकेने केलेले होते. अशा पद्धतीने त्या ठिकाणी काही सोसायटीने आपल्या नगरपालिकेला त्याबाबत पत्रही दिलेले आहे आणि ही तक्रार पोलिस स्टेशनलादेखील केलेली आहे. केळकर साहेब, मला वाटते काल तुम्हांला तेथील सोसायटीचे लोक भेटायला येणार होते. भेटले किंवा नाही भेटले मला कल्पना नाही. मी काल बाहेर होतो. तर त्या संदर्भात आपण काय कारवाई करणार? किंवा केलेली आहे. याबाबत जरा माहिती दिली तर बरे होईल आणि जर कारवाई केली नसेल तर तिथे तुम्ही प्रत्यक्ष जाऊन पाहणी करा. हा अतिशय निंदनिय प्रकार आहे. कारण नगरपालिका त्या ठिकाणी स्वखर्चाने एवढे मोठे झाडे लावते. खत दिले, माती दिली आणि कोणतरी तिकडचे स्थानिक लोक अशा तऱ्हेने झाडे उपटून टाकतात. ह्याच्यावर तुम्ही काय कारवाई करणार?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य दिनेश नलावडे साहेब, अशा तऱ्हेची माहिती तुम्ही आता सभागृहासमोर दिली. त्याबद्दल मी आभारी आहे आणि अशा तऱ्हेची तक्रार आतापर्यंन्त माझ्याकडे आलेली नाही.

**मोहन पाटील :-**

सन्मा. केळकर साहेबजी, जर सन्मा. सदस्य दिनेश नलावडेजी यांनी चांगल्या विषयावर या ठिकाणी भाष्य केले आणि आपल्याला एक चांगली माहिती दिलेली आहे. कृपया त्यांनी जर त्या लोकांची नांवे दिली तर आपण त्यांना कन्व्हेन्स पण करु शकतो किंवा कारवाईदेखील करु शकतो.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

लगेच कारवाई करु.

**दिनेश नलावडे :-**

तिथल्या लोकांनी आपल्याकडे लेखी तक्रार केलेली आहे आणि मला वाटते, तुमच्याकडे अजून लेटर यायला पाहिजे होते. तरीपण तुम्हांला सोसायटीची लोक येऊन भेटतील.

**मिलन म्हात्रे :-**

केळकर साहेब, हे दोन्ही विषय जर अगोदर सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल साहेबांनी सांगितले आणि यांनी सांगितले आणि आता हे सांगत आहेत. आपण स्वतः वृक्ष अधिकारी आहात. वृक्ष संवर्धनच्या सभेमध्ये या सर्व विषयावर चर्चा होते. उत्तनला जो प्रकार सांगितला, चारशे खड्डे बुजविले गेले. ते मा. आयुक्तांचे त्या सभेमध्ये आदेश आहेत. हे खरे म्हणजे तुम्ही सभागृहामध्ये सांगायला पाहिजे. मी बोलले नाही पाहिजे. ज्या डी.पी. रोडला आपण वायडिंग दिलेले आहे. त्याचे सेंन्टर पकडून ते जे चुकीचे खड्डे लावले गेलेले आहेत ते बुजविण्याचे आयुक्तांचे आदेश आहेत. त्या ठेकेदारांनी ते बुजविलेले नाहीत. ह्या सभेला प्रोसिडींग झाली आहे. आयुक्तांचे आदेश आपण पाळलेले आहेत. त्या ठेकेदारानेदेखील पाळले आहेत. चुकीची झाडे रोडमध्ये लावली ज्याला अठरा मीटर वायडिंग होणार आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

पण सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, प्रशासकीय अधिकारी नाहीत ना.

**मिलन म्हात्रे :-**

मी तेच बोलतो. त्यांनी करायला पाहिजे.

**चंद्रकांत वैती :-**

जी अनावधानाने माहिती राहिलेली आहे ती त्यांनी सभागृहासमोर आणली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ते सुद्धा त्या सभेमध्ये आहेत. मला प्रशासकीय अधिकारी बनायची हौस नाही. मी बनलो तर बरेच काही करीन. तर त्यांनी क्लिअर केले पाहिजे. ते बोलायला उभे राहिले. माझी अशी इच्छा होती की, त्या सभेमध्ये जे घडले ते आपण सभागृहाला दिले असते तर जरा मला बरे वाटले असते. आपण बसल्यानंतर मी हे बोललो. त्यामुळे पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून जरी हा विषय झाला असेल तरीसुद्धा सन्मा. सदस्य दिनेश नलावडेंच्या एरियामध्ये जे डंम्पिंग ग्राऊंड आहे तिकडे ज्या वांरवार केमिकलच्या आगी लागतात त्याबद्दलसुद्धा तिकडच्या पर्यावरणामध्ये वाईट आणि धोकादायक असे वातावरण आहे. मागच्या वेळेला मी स्वतः जाऊन फायर ब्रिगेडच्या गाड्या नेऊन आगी विझवल्या आहेत. तर त्याकरिता डॉक्टर साहेबांनी जे सांगितले की, ग्रीन कोर्ट क्लबला त्यांनी जो अहवाल दिला तो जो अहवाल बनविलेला आहे त्यापैकीचाच तो एक पार्ट आहे. त्यांनी तो थोडा संक्षिप्त दिला असेल पण खरा अहवाल असा जाडा आहे. तोसुद्धा मी बघितलेला आहे. पण त्याच्यामध्येसुद्धा भरपूर आहेत आणि आता कमी वेळ राहिलेली आहे. हा जो महिनाभराचा कालावधी आहे त्याच्यानंतर तो प्रिन्ट कधी होणार? त्याच्यानंतर तो तुम्ही सबमिट कधी करणार? याच्यानंतर त्याच्यामध्ये काही पिक्चर्स येतील. त्याच्यामध्ये आकडे येतील. या सगळ्याचा विचार करा. तुम्ही कुठलाही ठराव मांडा. तुम्ही घाई करु नका. पण आम्ही जे बोलतो त्याचा विचार करा. ठराव मांडायला फार घाई असते. याचे त्रास नंतर आपल्या सगळ्यांना भागावे लागतात आणि मी जे बोललो सर्व एरियात जसे आता सन्मा. सदस्य नितीन ठाकूर यांच्या वॉर्डमध्ये इंडस्ट्रीज आहेत. त्याच्या इंडस्ट्रीजमध्ये दगडाच्या कच-यापासून म्हणजे त्यांच्याकडे दगडाच्या मोठे मोठे कटर्स आहेत. मोठ्या मोठ्या वखारी आहेत. त्याच्यातून निघणारे पाणी, त्याच्यानंतर मैला, त्याच्यानंतर अनेक केमिकल्सच्यासुद्धा फॅक्टरीज आहेत. आमच्या दोघांचे वॉर्ड लागून आहेत. सभापती साहेबांचा सुद्धा वॉर्ड लागून आहे. मेन रोडमध्ये एक तो वॉर्ड आहे. एक हा वॉर्ड आहे. त्याकरिता तो जो संपूर्ण अहवाल दिलेला आहे त्याचा परत एकदा लवकरात लवकर आढावा घ्या. आम्हा नगरसेवकांना बोलावा. आम्हा नगरसेवकांना माहिती आहे. कुठे कुठे स्मॉल स्केल गेलेला आहे? कुठे गम निघतो? कुठे केमिकल निघते? कुठे प्लॅस्टीकचा कचरा निघतो? साहेब, याचा कुठेही विचार केला गेलानाही. कमी वेळ आहे. त्याच्याकरिता लवकरात लवकर प्रायोरिटी बेसवर ते करावे अशी माझी विनंती आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती महोदय, पर्यावरणाचा समतोल राखणे ही कोणाची जबाबदारी आहे?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

पर्यावरणाचा समतोल राखण्याची महानगरपालिकेची जबाबदारी आहे. महानगरपालिकेचीच नाही तर प्रत्येक नागरीकाचीसुद्धा जबाबदारी आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

प्रशासनामध्ये कोणाची जबाबदारी आहे?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

प्रशासनामध्ये सर्वांची जबाबदारी आहे. महापालिकेची, रहिवाशांची जबाबदारी आहे. हा फार मोठा वास्ट विषय आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

पर्यावरणाचा तिथे नाश होत असेल किंवा पर्यावरणाला बाधक गोष्ट होत असेल. नगरसेवकांनी वारंवार तक्रारी केलेल्या असतील. त्याचे अजूनपर्यंन्त काही समाधान होत नसेल. कारवाई होत नसेल तर कोणाची जबाबदारी आहे?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

महापालिकेची जबाबदारी आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

महापालिका म्हणजे काय?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

महानगरपालिका म्हणजे आम्ही सर्वच आलो.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आम्ही अधिकारी विचारतो तुम्ही महापालिका बोलता.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

अधिकारी मग आम्ही आहोत, आयुक्त साहेब आहेत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मग तुमची जबाबदारी आहे ना? साहेब, हे पत्र घ्या. वारंवार तक्रारी करुनसुद्धा आमच्या पातान बंदरला एक खाडी आहे. त्याला असा आडवा एक भराव टाकून नाला बंद केलेला आहे. आज ती संपूर्ण खाडी बंद झालेली आहे. मी ते साहेबांना नेऊन दाखविले. अशी परिस्थिती आहे की, जर उद्या पाऊस पडला हा जर पाऊस एक-दोन दिवस पडला तर तिथे महापूर येऊन गावेपण बुडतील. त्या खाडीची जागा बदलेल, माणसाची जीवितहानी देखील होईल. असे असतांना तो भराव अजून उचलला का जात नाही? या ऑर्डरसुद्धा आहेत.

**धनराज अग्रवाल :-**

आपल्याला ऑर्डर दिलेल्या आहेत. पण ते काम होत नाही.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

आपला अहवाल मी आताच पाहिला आणि हे जे तुमचे पत्र मिळाले यावर तात्काळ कारवाई केली जाईल आणि त्या संबंधी मी आताच आयुक्त साहेबांशी बोलतो.

**मोहन पाटील :-**

उपायुक्त साहेबांनी पत्राचा उल्लेख करावा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

इथे पत्राचा उल्लेख तर होणारच. त्या पत्रामध्ये त्यांनी खाडीचा भराव केल्याचे म्हटले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, त्या विभागामध्ये लाकडी पुलाचे नालेसफाईला कॉन्ट्रॅक्टर नेमले आहेत. तिथे आपल्या नगरपालिकेचे सफाई कर्मचारी ऑन ड्युटी काम करतात?

**चंद्रकांत वैती :-**

मा. सभापती साहेब, सन्मा. सदस्य पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल तयार करणे हा विषय मागील १०/०६/२००४ रोजीच्या सभेमध्ये आला होता. आपण तो त्या दिवशी तहकुब केला होता. पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल तयार करणे म्हणजे सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेबांनी सांगितले की, शहराच्या अमुक वस्तीमध्ये प्रदुषणाचा जास्त भाग आहे. मग हे पाण्याचे प्रदुषण असेल, सांडपाण्यापासून होणारे असेल किंवा हवेचे असेल, ध्वनी प्रदुषण असेल मग स्टेशन, बाजार अशा गजबजलेल्या ठिकाणी ध्वनी प्रदुषण असेल तर त्याची काय स्थिती आहे? त्या प्रदुषणाचे एकूण किती प्रमाण आहे? किंवा त्याच्यावर आपल्याला काय उपाययोजना करायची आहे? मग याच्यासाठी त्या तज्ञ मंडळींकडून आपल्याला संपूर्ण मिरा भाईंदर शहर आणि ग्रामीण क्षेत्रामध्ये कुठे कुठे प्रदुषणाचे कसे स्वरुप असेल? याची तपासणी केली जाईल आणि तसा अहवाल सादर केला जाईल आणि त्यासाठी आपल्या सभागृहासमोर हा विषय आलेला आहे. याच्यामध्ये काही सदस्यांनी सुचना केल्या. त्या सुचना लक्षात घेऊन संबंधित ज्यांना आपण हा पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल तयार करायला देणार आहोत. त्यांना तशा सुचना कराव्यात की, कुठे कुठे काय काय प्रकारचे जास्त वेस्ट होते आणि त्या त्या ठिकाणी ते स्पॉट लावून, त्या मशिनरी लावून पर्यावरणाने स्थितीदर्शक अहवाल तयार करावा आणि हा पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल तयार करण्यासाठी आपल्या सभागृहासमोर जो विषय आलेला आहे तो स्थितीदर्शक अहवाल तयार करावा. अशा ज्या संबंधित निविदा आलेल्या आहेत त्यांच्यामध्ये कमीत कमी दराची यांची निविदा आहे असा मी ठराव मांडत आहे.

**मोहन पाटील :-**

याला मी अनुमोदन देत आहे. अनुमोदन देण्यापुर्वी ठरावामध्ये चर्चा करतांना सन्मा. सदस्य चंद्रकांत वैतीजी यांनी ब-याच सुचना मांडल्या. मी डॉ. बावस्कर आणि प्रशासनाला सांगू इच्छितो की, मिरा भाईंदर परिसरामध्ये अशा असंख्य इंडस्ट्रीज आहेत. स्मॉल स्केल इंडस्ट्रीज आहेत. मघाशी सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी उल्लेख भाईंदर वेस्टचा केला. परुंतु, सर्वात जास्त इंडस्ट्रीज भाईंदर पुर्वेला आहेत आणि पुर्वेला असलेल्या इंडस्ट्रीजमध्ये आजची परिस्थिती एवढी भयानक आहे. त्या ठिकाणी गटारे बुजलेली आहेत. त्याचा वेस्ट त्या ठिकाणी पडलेला असतो. तो उचलला जात नाही. रस्त्याचे ठिकाणे नाही आहे. पोल्युशनच्या दृष्टीकोनातून इंडस्ट्रीमध्ये ज्या पद्धतीने आपण ना-हरकत दाखला द्यायला पाहिजे ते आपण त्यांना देऊ. पण ते देण्यापुर्वी त्यांना ज्या पद्धतीने ते व्यवस्थित राहायला पाहिजे त्याच्या कायद्याची आपण एक संहिता बनवायला पाहिजे की, जेणेकरुन इंडस्ट्रीजमध्ये

जे काम करणारे वर्कर्स किंवा मालक त्यांच्यापासून आपल्या या मिरा भाईंदर परिसरामध्ये येणारा रेव्हेन्यु हा अत्यंत मोलाचा आहे आणि महत्वाचा आहे व त्याकरिता आपण जातीने त्या ठिकाणी लक्ष घालून अशी एक समिती वगैरे स्थापन करावी अशी मी सभापती महोदयांना विनंती करतो की, ज्या समितीमार्फत त्या ठिकाणचे व्यवस्थापन बघितले जाईल. आज हा पर्यावरण स्थितीदर्शक ठराव या ठिकाणी आला. अवलोकनाचा ठराव आहे. त्याच्यावर आपण चर्चा मागच्या वेळी केली. ह्यावेळी देखील केली. सर्व सदस्यांचे त्यामध्ये समाधान होत नाही. परंतु अशी समिती आपण स्थापन करण्याच्या दृष्टीकोनातून पावले उचलावीत आणि त्याच्यामुळे आपल्याला संपूर्ण इंडस्ट्रीची जी देखरेख आहे ती आपल्याला करता येईल आणि त्या ठिकाणी जे वर्कर्स आणि मालक वर्ग आहेत त्यांना त्रास होतो. तो त्रास होणार नाही. अशा पद्धतीचा एक विषय आपण आणावा आणि या ठिकाणी इंडस्ट्रीज चांगल्या पद्धतीने ठेवण्यासाठी आपण सहकार्य करावे. मी या ठिकाणी अनुमोदन करतांना सुचना मांडत आहे. धन्यवाद.

**रिटा शाह :-**

अनुमोदन झालेले आहे. सुचनाही झालेली आहे. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब आणि सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब यांनी इंडस्ट्रीबद्दल काय अडचणी आणि काय पर्यावरण निर्माण होते तेही सांगितले आहे. पण महत्वाचा मुद्दा असा आहे की, आपण इंडस्ट्रीबद्दल विचार करतो पण जेवढा रेसिडेन्शिअल झोन आहे. माझी सुचना आहे, ठरावाबद्दल माझे काहीच ऑब्जेक्शन नाही आहे. रेसिडेन्शिअल झोनमध्ये बिल्डींगमध्ये छोटे छोटे कारखाने, बांगडी कारखाने, हे कारखाने, ते कारखाने त्याच्यावर महानगरपालिकेचे काहीही लक्ष नाही. तिथे चष्म्याचे फ्रेम बनवायचे कारखाने चालू आहेत. त्या हिशोबाने सोसायटीवाल्यांच्या त्याच्यावर लेखी तक्रारीदेखील आहेत. इंडस्ट्री झोनमध्ये पर्यावरणाचा प्रश्न निर्माण होतो. ते आपल्याला समजते. जिथे आर झोन आहे. लोक चाळीस फ्लॅटमध्ये राहतात आणि दोन फ्लॅटमध्ये कारखाने चालतात त्याच्यावर जास्त लक्ष द्या अशी माझी सुचना आहे.

**मिलन म्हात्रे :-**

प्रकरण क्र. ३३ चे काय झाले? दुरुस्त्यांसह मंजूर आहे का?

**मा. सभापती :-**

हो. दुरुस्त्यांसह मंजुर.

**प्रकरण क्र. ३३ :-**

पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल तयार करणेबाबत. (मा. स्थायी समितीचे अवलोकनार्थ सादर.) (दि. १०/०६/२००४ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. २०)

**ठराव क्र. ४१ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ अन्वये आयुक्त, शहरातील पर्यावरणाच्या स्थिती बाबतचा अहवाल शास्नाकडुन वेळोवेळी विहीत करण्यात येईल अशा पध्दतीने दर वर्षी ३१ जुलै पुर्वी महानगरपालिका तयार ठेवतील अशी तरतुद आहे. त्यानुसार महानगरपालिका क्षेत्रातील पर्यावरणाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. यात सार्वजनिक साफसफाई, पिण्याच्या पाण्याचे गुणवत्ता, ध्वनी प्रदुषण, हवेतील प्रदुषण, महानगरपालिका हद्दीतील गटारे/ नाल्यातील पाण्याचे परिक्षण, तलावाचे पाण्याचे परिक्षण, मातीचे परिक्षण करणे इत्यादींचा समावेश आहे. ध्वनी व वायु प्रदुषण तपासणीचे निकष प्रत्येक महिन्यास महत्वाचे ठिकाणी प्रदर्शीत करणे आवश्यक आहे. त्यासाठी ठळक बोर्ड तयार करुन नागरीकांना दिसेल अशा ठिकाणी ते लावणे गरजेचे आहे. पर्यावरण स्थिती दर्शक अहवाल तयार करण्यासाठी मा. आयुक्त यांनी एक समिती गठीत केलेली आहे. या समितीचे प्रमुख म्हणुन श्री. कल्याण केळकर, उपायुक्त (मुख्यालय) यांची नेमणुक केलेली आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील पर्यावरण स्थिती अहवाल तयार करणेसाठी व पर्यावरणाचे स्थिती बाबत तपासणी, चाचणी व परिक्षण करणेसाठी निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. निविदेस प्रतिसाद म्हणुन खालील निविदाकारांनी निविदा सादर केलेल्या आहेत.

१) अश्वमेध इंजिनिअर्स आणि कन्सलटंटस् को. ऑप. सोसायटी लि. इंदिरानगर, नासिक.
२) इनव्हायरो ॲनालिस्ट ॲन्ड इंजिनिअर्स प्रा. लि. जेसल पार्क, भाईंदर (पुर्व).
३) इनव्हायरो लॅबस् बागळे इंडस्ट्रीअल इस्टेट, ठाणे.
४) महाबळ इनव्हायरो इंजिनिअर्स प्रा. लि. बागळे इस्टेट, ठाणे.
५) मे. स्काय लॅब ॲनालिटीकल लॅबोरॅटरी कल्याण (पश्चिम).

निविदांचा पहिला लिफाफा दि. २९/१/२००४ रोजी दुपारी ३.०० वाजता निविदाकाराचे उपस्थितीत निविदा समितीसमोर उघडण्यात आलेल्या निविदेतील लिफाफा क्र. १ चा तुलनात्मक अभ्यास करुन निविदेचा लिफाफा क्र. २ दि. २१/०२/२००४ रोजी उघडण्यात आला. आलेल्या निविदाचा तुलनात्मक अभ्यास करुन तांत्रिक बाबी व दराचे बाबींचा तपशिल सोबत जोडलेला आहे. निविदा दर मागवितांना फेब्रुवारी २००४ ते मे २००५ हा १६ महिन्याचा कालावधी विचारात घेतलेला आहे. प्रत्येक वर्षी जुलै महिन्यात पर्यावरण स्थिती दर्शक अहवाल मा. महापालिका सर्वसाधारण सभेस सादर करावा लागतो. या वर्षाचे मे व जुन महिन्यातील विविध तपासण्या, चाचण्या व निकष विचारात घेऊन अहवाल तयार करण्यात येईल. त्यानंतर प्रत्येक महिन्यातील निकष विचारात घेऊन पर्यावरण समतोल रहाण्यासाठी योग्य ती उपाययोजना करता येईल व वर्षभराचे निकष विचारात घेऊन पुढील वर्षाचा अहवाल तयार करण्यात येईल. आर्थिक वर्ष मार्च २००५ पर्यंतच्या खर्चास मंजुरी घेणे आवश्यक आहे. उर्वरीत दोन महिन्याचे कालावधीसाठी फक्त दर मंजुर करण्यास शिफारस आहे. ही बाब विचारात घेऊन आलेल्या निविदेतील सोबत जोडलेल्या दराचे तुलनात्मक अभ्यासानुसार मे २००४ ते मार्च २००५ या ११ महिन्याचे कालावधीसाठी खालील प्रमाणे दर आहेत.

| **अ.क्र.** | **निविदाकाराचे नाव** | **दर ११ महिन्या करीता तपासणी व अहवाल तयार करणे** |
|---|---|---|
| १ | इनव्हायरो ॲनॅलिस्ट ॲन्ड इंजिनिअर्स प्रा. लि., भाईंदर. | रु. ३,४४,८६६.७५ |
| २ | महाबल इनव्हायरो इंजिनिअर्स प्रा. लि., ठाणे. | रु. ११,५६,७००/- |
| ३ | अश्वमेध इंजिनिअर्स ॲन्ड कन्सलटंट, नासिक. | रु. १२,६६,७०७.७५ |
| ४ | इनव्हायरो लॅबस्, ठाणे. | रु. १६,१७,१००/- |
| ५ | स्काय लॅब, कल्याण | रु. ९,१७,९१०/- |

वरील सर्व बाबींचा विचार केल्यास इनव्हायरो ॲनॅलिस्ट ॲन्ड इंजिनिअर्स प्रा. लि., जेसल पार्क, भाईंदर (पुर्व) यांचेनिविदा दर सर्वात कमी असुन ते स्विकारणेस शिफारस करण्यात येत आहे. मे २००४ ते मे २००५ पर्यंत पर्यावरणाचा अभ्यास करण्यासाठी विविध तपासण्या, चाचण्या परिक्षणासाठी मागविण्यात आलेल्या निविदेतील सर्वात कमी दराची इनव्हायरो ॲनॅलिस्ट ॲन्ड इंजिनिअर्स प्रा. लि., भाईंदर यांची सर्वात कमी दराची निविदा स्विकारणेस व मे २००४ ते मार्च २००५ पर्यंतच्या तपासण्या, चाचण्या, परिक्षण करणे त्यासाठी येणाऱ्या रु. ३,४४,८६६.७५ खर्चास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे. सदरचा खर्च पर्यावरण स्थिती दर्शक अहवाल तयार करणे या लेखा शिर्षा खालील रु. ५,००,०००/- तरतुदी मधुन करण्यात येईल. सदर प्रकरणाचे मा. स्थायी समीतीने अवलोकन करुन मंजूरी देण्यात येत आहे.

महानगरपालिका क्षेत्रात अनेक लघुउद्योग आहेत. त्यांची अवस्था चांगली नाही तेथील कामगारांना अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत काम करावे लागते. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासाळत आहे. याचा अभ्यास करुन त्यावर उपाययोजना करणे आवश्यक आहे. याशिवाय बऱ्याच भागात निवासी विभागात प्रदुषण करणारे लघु उद्योग आहेत. या सर्व बाबींचा अभ्यास करण्यासाठी व उपाययोजना सुचविण्यासाठी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मा. मॉरस रॉड्रिक्स | सभापती<br>स्थायी समिती | अध्यक्ष |
| २ | श्री. मोहन पाटील | सभासद<br>स्थायी समिती | सदस्य |
| ३ | श्री. शरद पाटील | सदस्य<br>स्थायी समिती | सदस्य |
| ४ | श्री. मिलन म्हात्रे | सदस्य<br>स्थायी समिती | सदस्य |
| ५ | श्री. अशोक पाटील | सदस्य<br>स्थायी समिती | सदस्य |
| ६ | सौ. रिटा शहा | सदस्य<br>स्थायी समिती | सदस्य |
| ७ | श्री. कल्याण केळकर | उपायुक्त | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | श्री शरद वैरागडे | शहर अभियंता | सदस्य |
| ९ | श्री. एन. आर. शेंडे | नगर रचनाकार | सदस्य |
| १० | डॉ. बी. एस. बावसकर | विशेष कार्य अधिकारी आरोग्य विभाग | सदस्य |

वरील समितीने वरील अभ्यास करुन एक महिन्याचे कालावधीत अहवाल सादर करावा असे ठरविण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.** **अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ३४ चे वाचन केले.)

**चंद्रकांत वैती :-**

या ठरावावर मी गेल्या सभेत ठराव केला होता की, रस्त्याचे काम पूर्ण होऊ दे. त्यानंतर सुशोभिकरण, सुंदरीकरण जे आपले आलेले आहेत ते मिरा रोडमधील रस्त्यांचे आलेले आहेत आणि सगळ्यांची कामे चालू आहेत.

**धनराज अग्रवाल :-**

जागा ताब्यात घेतलेली आहे. परत प्रस्ताव कशाला आणता, तेच माहिती पडत नाही? घाई काय लागलेली आहे?

**चंद्रकांत वैती :-**

जागा ताब्यात घ्याव्यात. रस्त्यांची कामे पूर्ण व्हावीत आणि नंतर हा विषय पुनःश्च आणावा असे आपले ठरलेले होते.

**मिलन म्हात्रे :-**

पण त्याच्यामध्ये जे रस्ते आता तुमच्या ताब्यात आहेत आणि आपल्याला आता करायचे आहेत. या ठरावामुळे तुमचा काशीमिरा रोड पण थांबेल. रस्ते आधीच झालेले आहेत. त्यांना आपण याच्यामधून सूट दिली तर काय फरक पडतो?

**चंद्रकांत वैती :-**

पण सगळ्या रस्त्याचा त्याच्यात प्रस्ताव नाही आहे. फक्त तीन रस्त्यांचा प्रस्ताव त्यामध्ये आहे आणि हे तीनही रस्ते अन्डर कन्स्ट्रक्शन आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

मग ठिक आहे. ते वगळून झालेले असतील तर ते करायला काय हरकत आहे?

**प्रकरण क्र. ३४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विविध रस्ते सुशोभिकरण करणेबात आलेल्या प्रस्तावांबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. (दि. १०/०६/२००४ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. २२)

**ठराव क्र. ४२ :-**

मा. सभापती सोा. यांच्या आदेशानुसार सदरचा विषय सर्व प्रस्तावांसह पुढील सभेत घेण्यांचे सुचित करण्यांत आले.

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ३५ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय, प्रकरण क्र. ३१ मध्ये मागच्या वेळेला आपण मांडले. माझ्या माहितीनुसार साई ऑटो गॅरेज आणि वाय. सी. स्पेअर. प्रत्येक निविदेला तीन लिफाफे पाहिले. ते तसे तीन स्पर्धक असावे लागतात. पण आपल्याला इथे दोन दिसत आहेत. मागे ही चर्चा झाली की, आपल्याला छोट्या-छोट्या गाड्या रिपेअर करायला लागत आहेत. तुम्हांला तसे बघायला गेले तर हातखर्च मिळत असतो. आपण त्या डिपार्टमेंन्टला देऊन गाड्या टेंन्डर व्यवस्थित होईपर्यंन्त आपण करु शकतो. काय अगदी हे नाही आहे. हे जर टेंन्डर मंजुर केले नाहीत आहे तर तुमच्या सगळ्या गाड्या लगेच बंद होतील अशातला भाग नाही आहे. इथे जी दोन टेंन्डर दिलेली आहेत. त्याच्यामध्ये जी गॅरेजेस त्यांनी दाखविलेली आहेत. हा विषय ह्या आल्यावर मी मुद्दामहून उल्लेख करु इच्छितो की, सदर गॅरेजला आपल्या महानगरपालिकेची परवानगी नाही आहे. तुमचे जे सर्व्हिस स्टेशन आहे. हे सर्व्हिस स्टेशन ती जागा मागच्या वेळेला सॉल्ट डिपार्टमेंन्टवाल्यांनी सील केली होती. ह्या सगळ्याचा विचार करा आणि व्यवस्थित असेल तर हे दोन असल्या कारणाने हे रिकॉल करुन तुम्ही व्यवस्थित ज्यांची ज्यांची जे काय असेल आणि भाईंदरमध्ये कुठल्याही गॅरेजला सर्व्हिस स्टेशन नाही आहे. सर्व्हिसचे काम आपण पेट्रोल पंपाला द्यावे. गॅरेजचे काम गॅरेजने करावे. कारण पेट्रोल पंपालासुद्धा आपल्याला एकाच साईवालाला सर्व्हिस स्टेशन आहे. त्याच्यावर हायवेवर गेलेले आहे. तर या सगळ्याचा विचार करा आणि आपले टेन्डर ठेकेदाराचे नांव या दोन याच्यावर तुमचे कसे काय येऊन थांबते? हा रिकॉल केला पाहिजे. दर वगैरे सर्व नंतर आणि मागच्या वेळेला सन्मा. सदस्य याकुब कुरेशी यांनी सांगितले होते की, पुढच्या सभेत या सगळ्यांची आम्हांला व्यवस्थित यादी द्या. ही अनरिडेबल लिस्ट आहे. गॅरेज तिसरीकडे सर्व्हिस स्टेशन चौथीकडे. साठ फुट रोडला तुमचे गॅरेज दाखविलेले आहे. शशिकांत नगर या आपल्या सदनाचे सदस्य यांच्या इकडचा शशिकांत नगरचा ॲड्रेस दिलेला आहे. सभापती साहेबांच्या वॉर्डमधील ती बिल्डींग आहे. साहेब तिकडे गॅरेज आहे का? नाही आहे. गॅरेज शशिकांत नगरला दाखविले गेले आहे. याच्यामध्ये आपण निर्णय घेतांना मागे सभागृहामध्ये स्पष्ट सांगितले होते ही अनरिडेबल लिस्ट आहे. आम्हांला याच्यातील काहीच कळत नाही.

**रिटा शाह :-**

साहेब, मागच्या सभेमध्ये सभापती साहेबांना चांगली सुचना मांडायचे हे नाही. सभापती आहे. पण त्यांची एक कळकळ आहे. त्यांनी एक आपल्यासमोर निवेदन केले होते की, आपण सदर काम डायरेक्ट कंपनीला द्यायला पाहिजे. टेंन्डर वगैरे न काढता डायरेक्ट कंपनीला म्हणजे आता सर्व्हिस स्टेशन आपल्या मिरा भाईंदरमध्ये कंपनीचे आहे. त्यांच्याकडे डायरेक्ट पाठवून द्या.

**चंद्रकांत वैती :-**

आपल्या महानगरपालिकेमध्ये गेल्या सहा-आठ महिन्यांपासून हा प्रकार चाललेला आहे आणि तीन वेळा याच्या आधी टेंन्डर काढले होते. तीन्ही वेळेला त्यात प्रॉब्लेम झाले. महानगरपालिका वाहनासाठी स्पेअर पार्टस् नसल्यामुळे इकडे तिकडे छोट्या छोट्या कामांसाठी गाड्या थांबून असतात. तर स्पेअर पार्टस् पुरवठा करुन दुरुस्ती करणेकामी वार्षिक निविदांना मंजुरी देण्याबाबतचा विषय मागच्या सभेमध्ये आला होता आणि ते प्रकरण तहकुब झाले होते. त्यावेळेला मी ठराव मांडलेला होता, पुनःश्च महानगरपालिका वाहनांसाठी स्पेअर पार्टस् पुरवावे. दुरुस्ती करणेकामी वार्षिक निविदांना मंजुरी देण्यांत यावी असा मी ठराव मांडत आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

सदर ठरावास मी अनुमोदन देत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पण या ठरावामध्ये ज्या दोन निविदांना आता तुम्ही मंजुरी दिली का?

**मा. सभापती :-**

आपण कमीत कमी दोन, तीन, चारला मंजुरी देऊ शकतो. एकालाच देऊ शकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही टेंन्डर रिकॉल केले का? विषय तहकुब झालेले आहेत. टेन्डर रिकॉल झालेले नाही आहेत आणि ज्या कंपन्यांना आता तुम्ही या ठरावाला मंजुरी देता आहात त्यांची गॅरेजेस याला तुमची परवानगी नाही. सर्व्हिस स्टेशनला महानगरपालिकेची परवानगी नाही. हे मी मुद्दामहून उल्लेख करु इच्छितो, जे फोटो लावलेले आहेत त्याला परवानगी नाही. शशिकांत नगरला त्यांनी गॅरेज दाखविलेले आहे. त्याचा पत्ता तुमच्या लेटरहेडवर तुमच्या ज्या कंपन्या आहेत त्यावर गॅरेज नाहीच आहे. शोरुम

आहे. ऑफीस हेच पत्ते आहेत. त्याच्या लेटरहेडवर आहेत त्याच्यावर त्याने मटेरियलची लिस्ट करुन दिली आहे. ह्याला आपण परवानगी देणार आहोत का? तुम्ही तुमच्या अधिकाऱ्यांना हातखर्चाला पैसे द्या आणि तुम्ही करुन घ्या. माझे तर स्पष्ट म्हणणे आहे की, भाईंदरमधील स्थानिक गॅरेजला तुमचे पेमेन्ट झालेले नाहीत. अनेक लोकांच्या महानगरपालिकेच्या उधाऱ्या बाकी आहेत. वाहन विभागातर्फे बिले काढत नाहीत म्हणून तुमच्या गाड्या कोण उभ्या करीत नाहीत. कितीतरी गॅरेजवाल्यांची लाखो रुपयांची पेमेन्ट बाकी आहेत. गाड्या घेऊन आले की, पेमेन्टच कोण करत नाही. मागे आयुक्त साहेब, आपण असतांना तुम्ही आदेश दिले होते, गणेश बॅटरीवाल्याचे पैसे द्यायचे पण अजून पेमेन्ट झालेले नाही. त्या माणसाने बॅटऱ्या देऊनसुद्धा जवळजवळ तीन-चार वर्षे तो पैशाकरिता चकरा मारित आहे. आता बॅटरीत तर काही फॉल्ट नाही ना? नवीन आय.एस.आय. कंपनीची बॅटरी त्याने तुम्हांला डिलीव्हर केली. डिलीव्हरी चलनावर त्यांच्या सह्या आहेत. सगळे काही आहे. कंपनी गॅरेन्टी प्रिन्टचा माल तुमच्या ताब्यात आला आणि त्याला तुमचे पेमेंन्ट झालेले नाही. ह्याच्यावर कोण कारवाई करेल का? कोणच करत नाही.

**मा. सभापती :-**

नगरपालिकेची महानगरपालिका झाली.

**मिलन म्हात्रे :-**

असू दे. गाड्या त्याच आहेत. गाडीचा चलनावर तोच नंबर आहे. जी आता आपण गाडी वापरतो आहे. फक्त नांव बदलले. नगरपालिकेच्या ऐवजी महानगरपालिका झाले. मालक आणि गाडीचा नंबर तोच आहे आणि त्याच्यातील बॅटरी नंबर पण तोच आहे. तुम्ही ठराव पास करता. या सगळ्या हरकती, मुद्दे लक्षात घ्या. ठराव पास करा. या दोन याला माझा विरोध आहे तो नोंदवून घ्या. म्हणजे मी वर अपिलात जायला मोकळा.

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर झाला.

**मिलन म्हात्रे :-**

हो, माझा त्यामध्ये विरोध नोंदवून घ्या.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मा. सभापती साहेब, कायद्यामध्ये अशी प्रोव्हिजन नाही की, टेंन्डर काढल्यानंतर तीनच टेंन्डर यायला पाहिजे असे काही नाही. कॉम्पीटीशन झाले की नाही? कॉम्पीटीशन दोनमध्ये पण होऊ शकते आणि ही तीन वेळा रिकॉल केलेले आहे आणि अठरा गाड्या बंद आहेत.

**याकुब कुरेशी :-**

साहेब, मी काय बोलतो? ठराव मंजुर झाला मग चर्चा कशाला करता. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ३५ :-**

महानगरपालिका वाहनांसाठी स्पेअरपार्ट पुरवठा करुन दुरुस्ती करणे कामी वार्षिक निविदांना मंजूरी देणे. (ग्रूप १ - ॲम्बेसेडर, कार, कॉन्टेसा कार, मारुती इस्टीम, फोर्ड आयकॉन व महिंद्रा जीप.) (दि. १७/०६/२००४ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ३१)

**ठराव क्र. ४३ :-**

महानगरपालिका वाहनांसाठी स्पेअरपार्टस पुरवठा करुन दुरुस्ती करणे कामी सन २००३-०४ करीता दि. ०२/०८/०३ व दि. १०/१२/०३ रोजी वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करुन दोन वेळेस निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु दोन्ही वेळेसच्या प्राप्त निविदा नामंजूर करण्यात आल्या होत्या. त्यामुळे वाहनांची दुरुस्ती कामे करवणे वारंवार अडचणी निर्माण झाल्या आहेत. तसेच सदरबाबत सन २००३-०४ चे आर्थीक वर्ष संपल्याने सन २००४-०५ करीता निविदा मागविणे आचार संहीतेमुळे निवडणूक आयोगाची मंजूरी घेऊन दि. २४/०४/०४ व २५/०४/०४ रोजी अनुक्रमे 'दै. सकाळ व दै. सुरजप्रकाश' या वृत्तपत्रात प्रसिद्ध करुन निविदा मागविण्यात आल्या असता खालील दोन ठेकेदारांनी निविदा मुदतीत सादर केल्या आहेत.

| अ.क्र. | ठेकेदारांचे नांव |
|---|---|
| १) | मे. साई ऑटो गॅरेज. |
| २) | मे. वाय. सी. स्पेअर्स. |

सदर प्राप्त निविदा दि. १२/०५/०४ रोजी उपस्थित निविदाधारकां समोर प्रथम लिफाफा क्र. १ उघडण्याची प्रक्रिया करण्यात आली. तसेच त्यानंतर ठेकेदारांच्या वर्कशॉप व सर्विस स्टेशनबाबत

प्रत्यक्षात जाऊन पाहणी केली असता वरील दोन्ही ठेकेदारांची गॅरेज वर्कशॉप व सर्विस स्टेशन सुस्थितीत व समाधानकारक असल्याचे आढळले. त्यामुळे याबाबत चे दोन्ही ठेकेदारांचे लिफाफा क्र. २ दि. २१/०५/२००४ रोजी उघडण्यांत आले.

दोन्ही ठेकेदारांच्या निविदेतील दरांची तुलना केली असता विविध वाहनांसाठी व विविध कामांसाठी सादर केलेले दर दोन्ही ठेकेदारांचे कमी जास्त प्रमाणात कमी आहे. म्हणजे एका वाहनाच्या सर्व कामांसाठी एकाच ठेकेदाराचे दर कमी नसून एका वाहनांच्या काही कामांसाठी मे. साई ऑटो गॅरेज व काही कामांसाठी मे. वाय. सी. स्पेअर्स यांचे दर कमी आहेत. त्यामुळे कोणा एका ठेकेदाराचे सर्व दर मान्य न करता जो कमीत कमी दर असेल तो स्विकारणे योग्य होईल. त्याप्रमाणे वाहनांच्या प्रकारानुसार खालीलप्रमाणे दोन ठेकेदारांचे दर कमी आहेत.

| **अ.क्र.** | **वाहनांचा प्रकार** | **मे. वाय. सी. स्पेअर्स** | **मे. साई ऑटो गॅरेज** |
|---|---|---|---|
| १. | ॲम्बेसेडर कार | १२० कामांसाठी | २३४ कामांसाठी |
| २. | कॉन्टेसा कार (डिझेल) | १२२ कामांसाठी | २४५ कामांसाठी |
| ३. | कॉन्टेसा कार (पेट्रोल) | २५५ कामांसाठी | २२५ कामांसाठी |
| ४. | मारुती इस्टीम | ९७ कामांसाठी | २४० कामांसाठी |
| ५. | फोर्ट आयकोन | १८२ कामांसाठी | ५४ कामांसाठी |
| ६. | महिन्द्रा जीप | १३५ कामांसाठी | २३२ कामांसाठी |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १, २, ४ व ६ करीता मे. साई ऑटो गॅरेज यांचे दर जास्तीत जास्त कामांसाठी कमी आहेत. तसेच अ.क्र. ०३ व ०५ करीत मे. वाय. सी. स्पेअर्स यांचे दर जास्तीत जास्त कामांसाठी कमी आहेत. तसेच दोन्ही ठेकेदारांना दि. २८/०५/०४ रोजी प्रत्यक्ष चर्चेसाठी बोलविले असता दोन्ही ठेकेदारांनी कमीत कमी दराने काम करण्याची तयारी दर्शविली आहे.

तरी निविदेतील कमीत कमी दराने अ.क्र. ०१, ०२, ०४ व ०६ करीत मे. साई ऑटो गॅरेज व अ.क्र. ०३ व ०५ करीत मे. वाय. सी. स्पेअर्स यांची निविदा स्विकारणे व त्या कामी देयक अदा करणेस मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनीयम १९४९, चे कलम ७३ नुसार मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ३६ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

प्रकरण क्र. ३२ बद्दल काय माहिती दिली? प्रकरण क्र. ३२ बद्दल बोलत होतो. प्रकरण क्र. ३२ मध्ये तुमच्या निविदा आहे. साहेब, आपण पुर्वी मिटींग कन्डक्ट करतांना आपण अनेक निर्णय दिलेले आहेत. जे प्रोसिडींगमध्ये आहेत.

**चंद्रकांत वैती :-**

ह्या विषयासंदर्भात ठराव मंजुर करुन घेण्यांत यावा.

**हॅरल बोर्जीस :-**

अनुमोदन.

**मिलन म्हात्रे :-**

आपण त्यावेळेला प्रोसिडींगमध्ये मंजुरी देतांना दिले की, त्याला प्रतिस्पर्धी नाही म्हणून हा नाकारण्यांत यतो. तुम्ही दोघांमध्ये डॉक्युमेंन्टमध्ये टेक्निकल काय कागद घेतले? तुमची परमिशन नसेल. उद्या मी तुम्हांला ते गॅरेज तोडायला लावेन. चालेल का? याचे तुम्हांला परमिशन नाही. उद्या तुमचे टेंन्डर दाखवून तो लिगल करेल.

**याकुब कुरेशी :-**

तोच गोषवारा दिलेला आहे. परंतु, जे आयटम दिलेले होते. माझा जो विरोध होता ते आयटम वाचता येत नव्हते. त्याच्यामध्ये माझा विरोध होता. माझा या ठरावामध्ये विरोध नव्हता.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य याकुब कुरेशी यांना मागच्या वेळी व्यवस्थित टिपणी मिळाली नव्हती. आता त्यांना टिपणी व्यवस्थित मिळालेली आहे. त्यांचे समाधान झालेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

प्रश्न त्याचा नाही आहे. मी जे म्हणतो ते साहेब, माझे असे आहे की, दोन गॅरेजेस आहेत. ती तरी धड असावीत. ती पण नाही आहेत. या सगळ्याची तुम्ही नोंद करा. या दोन्ही विषयावर माझा विरोध घ्या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेब, जे प्रकरण क्र. ३६ आहे, आता मच्छराचे एवढे जागोजागी झालेले आहे. तर मच्छर मारायचे बघा.

**याकुब कुरेशी :-**

आपण गाड्या रिपेअरींग करण्याची परवानगी दिली. त्यावेळेस मच्छर मरतील.

**प्रकरण क्र. ३६ :-**

महानगरपालिका वाहनांसाठी स्पेअरपार्ट पुरवठा करुन दुरुस्ती करणे कामी वार्षिक निविदांना मंजूरी देणे. (ग्रुप २-फायर फायटर, पाणी टँकर, धुर फवारणी मशीन, शव वाहिनी, फिरता दवाखाना, सक्शन, जेटींग, ॲम्बुलेन्स, कचरा वाहतूकीचे ट्रक, टेम्पो, महिन्द्रा ट्रॅक्टर) (दि. १७/०६/२००४ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ३२)

**ठराव क्र. ४४ :-**

महानगरपालिका वाहनांसाठी स्पेअरपार्टस पुरवठा करुन दुरुस्ती करणे कामी सन २००३-०४ करीता दि. ०२/०८/०३ व दि. १०/१२/०३ रोजी वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करुन दोन वेळेस निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु दोन्ही वेळेसच्या प्राप्त निविदा नामंजूर करण्यात आल्या होत्या. त्यामुळे वाहनांची दुरुस्ती कामे करणेस वारंवार अडचणी निर्माण झाल्या आहेत. तसेच सदर बाबत सन २००३-०४ चे आर्थिक वर्ष संपल्याने सन २००४-०५ करीता निविदा मागविणे आचार संहीतेमुळे निवडणूक आयोगाची मंजूरी घेऊन दि. २४-०४-०४ व २५-०४-०४ रोजी अनुक्रमे 'दै. सकाळ व दै. सुरज प्रकाश' या वृत्तपत्रात जाहीर निविदा सुचना प्रसिद्ध करुन निविदा मागविण्यात आल्या असता खालील दोन ठेकेदारांनी निविदा मुदतीत सादर केल्या आहेत.

| अ.क्र. | ठेकेदारांचे नांव |
|---|---|
| १) | मे. वाय. सी. स्पेअर्स. |
| २) | मे कमिन्स ऑटो सर्विस |

सदर प्राप्त निविदा दि. १२/०५/०४ रोजी उपस्थित निविदा धारकांसमोर प्रथम लिफाफा क्र. १ उघडण्याची प्रक्रिया करण्यात आली. परंतु मे. कमिन्स ऑटो सर्विसेस यांचे निविदेचा मोठा लिफाफा उघडला तेव्हा असे निदर्शनास आले की, मे. कमिन्स ऑटो सर्विसेस यांनी निविदा सादर करतांना दोन लिफाफा पद्धतीने सादर न करता एकाच लिफाफ्यात लिफाफ्यात निविदा सादर केली होती त्यामुळे त्यांची दरसुची आपोआपच उघडली गेली तसेच असेही निदर्शनास आले की, मे. कमिन्स ऑटो सर्विसेस यांनी निविदेसोबत बयाणा रकमेचा डी. डी. सादर केलेला नाही त्यामुळे त्यांची निविदा विचारात घेता येत नाही तसेच दोन्हीही ठेकेदारांचे वर्कशॉप व सर्विस स्टेशनबाबत प्रत्यक्षात जाऊन पाहणी केली असता वरिल दोन्ही ठेकेदारांची गॅरेज वर्कशॉप व सर्विस स्टेशन सुस्थितीत असुन समाधानकारक असल्याचे आढळले त्यामुळे याबाबत दुसरे ठेकेदार मे. वाय. सी. स्पेअर्स यांचा निविदेचा लिफाफा क्र. २ दि. २१/०५/२००४ रोजी उघडण्यांत आला.

सदर बाबत मे. कमिन्स ऑटो सर्विस यांनी बयाणा रकमेचा डी.डी. निविदेसोबत सादर न केल्याने त्यांची निविदा विचारात घेता येत नाही. परंतु त्यांची दरसूची वर नमुद केल्या प्रमाणे आपोआपच उघडल्याने तुलनेसाठी त्यांचे दर उपलब्ध आहेत त्यानुसार त्याचे दराशी तुलना केली असता विविध वाहनांसाठी विविध कामांसाठी सादर केलेले दर दोन्ही ठेकेदाराचे कमी जास्त प्रमाणात कमी आहेत. म्हणजेच एका प्रकारच्या वाहनाच्या सर्व कामासाठी मे. वाय. सी. स्पेअर्स यांचे दर कमी नाहीत तर काही कामासाठी मे. वाय. सी. स्पेअर्स यांचे दर कमी आहेत. तर कामी कामांसाठी मे. कमिन्स ऑटो सर्विसेस यांचे दर कमी आहेत. त्यामुळे जो कमीत कमी दर असेल तो स्विकारणे फायदेशीर होईल. त्याप्रमाणे वाहनांच्या प्रकारानुसर खालीलप्रमाणे कमीत कमी दर आहेत.

| अ.क्र. | वाहनांचा प्रकार | मे. वाय. सी. स्पेअर्स | मे. कमिन्स ॲटो गॅरेज |
|---|---|---|---|
| १. | टाटा ४०७ | २४१ कामांसाठी | १५० कामांसाठी |
| २. | टाटा ६०९ | २२४ कामांसाठी | १५६ कामांसाठी |
| ३. | टाटा ७०९ | २२८ कामांसाठी | १४५ कामांसाठी |
| ४. | टाटा १२१० | २५९ कामांसाठी | १२६ कामांसाठी |
| ५. | टाटा १६१२ | २६८ कामांसाठी | १२० कामांसाठी |
| ६. | टाटा १६१३ | २७० कामांसाठी | ११३ कामांसाठी |
| ७. | महिन्द्रा ट्रॅक्टर २७५ | सर्व कामांसाठी | |
| ८. | महिन्द्रा ट्रॅक्टर ५७५ | सर्व कामांसाठी | |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ ते ६ करिता मे. वाय. सी. स्पेअर्स यांचे जास्तीत जास्त दर कमी आहेत तसेच ७ व ८ करिता मे. कमिन्स ऑटो सर्विस यांनी दर सादर केलेले नाहीत. त्यामुळे त्यासाठी मे. वाय. सी. स्पेअर्स यांचे दर मान्य करणे आवश्यक आहे. तसेच मे. वाय. सी. स्पेअर्स यांना प्रत्यक्ष चर्चेसाठी बोलविले असता त्यांनी निविदेतील कमीत कमी दराने काम करण्याची तयारी दर्शविली आहे. तरी निविदेतील कमीत कमी दराने अ.क्र. १ ते ८ च्या वानंसाठी मे. वाय. सी. स्पेअर्स यांची निविदा स्विकारुन त्या कामी देयक अदा करणेस मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९, चे कलम ७३ नुसार मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ३७ चे वाचन केले.)

**आसिफ शेख :-**

प्रकरण क्र. ३७ मंजुर आहे.

**चंद्रकांत वैती :-**

माझे अनुमोदन आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

त्याला चार वारस आहेत. एकाने ॲप्लिकेशन केले तर तीन वारसांचे काय? त्यांची एन.ओ.सी. पाहिजे. उद्या जर त्यांनी ऑब्जेक्शन घेतले.

**चंद्रकांत वैती :-**

ते ॲफिडेव्हीट घेतात. ते सर्व रितसर होते. त्याच्यात काही चुक नाही.

**याकुब कुरेशी :-**

ॲफिडेव्हीट दिल्यानंतरच होईल.

**प्र. सचिव :-**

सगळ्यांना दिले आहे.

**चंद्रकांत वैती :-**

ॲफिडेव्हीट दिल्याशिवाय विषय आणला जात नाही.

**प्रकरण क्र. ३७ :-**

अनुकंपा तत्वावर कामावर घेणेबाबत. - कु. विनया पिटर मिरांडा

**ठराव क्र. ४५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाच्या आस्थापनेवर श्रीम. रोझी पिटर मिरांडा या सहा.शिक्षिका म्हणून दि. २/७/१९७१ पासून पूर्णवेळ कार्यरत होत्या त्यांचे दि. २३/१०/१९९७ रोजी निधन झाले असून त्यांच्या पश्चात एकूण चार वारस आहेत. त्याचे पती वयोवृध्द असून दोन मुली विवाहीत आहेत व कुमारी विनया पिटर मिरांडा या अविवाहीत असून सध्या वडिलांचे पालन पोषण करणे ही सर्व

जबाबदारी त्यांची आहे. त्यांचे शिक्षण बी.कॉम पर्यंत झालेले असून त्यांनी आईच्या जागेवर अनुकंपा तत्वावर महानगरपालिका सेवेत नोकरीवर ठेवून घेण्यास विनंती केली आहे.

शासन निर्णय क्र.सीपीटी/२००१/(१५९७-भाग-३) प्रा.शि.-२, दिनांक २०/४/२००२ नुसार प्राथमिक शिक्षक हे महानगरपालिकेचे कर्मचारी असल्याने शिक्षक कर्मचाऱ्यास अथवा त्यांच्या वारसास सेवा निवृत्ती वेतन/कुटूंब निवृत्ती वेतन व इतर लाभ देणे हि त्या त्या स्थानिक संस्थेची नैत्तिक जबाबदारी आहे. त्यास अनुसरुन व सामान्य प्रशासन विभागाने पुढील प्रमाणे वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. अकंपा/१०९३/२३३५/प्र.क्र.९०/९३/आठ, दि. २६/१०/९४, शासन निर्णय क्र. सामान्य प्रशासन विभाग क्र. अकंपा/१०९३/२३३५/ प्र.क्र.९०/९३/आठ, दि. १२/३/१९९७, शासन निर्णय क्र. सामान्य प्रशासन विभाग क्र. अकंपा/१०००/ प्र.क्र.२०/२०००/आठ, दि. २८/३/२००१, शासन निर्णय क्र. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. सामान्य प्रशासन विभाग क्र. अकंपा/१००३/प्र.क्र.२५/२००३/आठ, दिनांक १३/६/२००३, सामान्य प्रशासन विभाग क्र. अकंपा/१००३/ प्र.क्र.५१/२००३/आठ, दि. २९/१०/०३, अंतर्गत तरतूदीनुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकास अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबत निर्देश असून तद्नुषंगाने सदर प्रकरणी दिवंगत श्रीम. रोझी पिटर मिरांडा (सहा. शिक्षिका) यांची वारस अविवाहीत मुलगी कुमारी विनया पिटर मिरांडा हिस शैक्षणिक अर्हतेनुसार गट **क** मधील रिक्त **लिपीक** पदावर रु. ३०५०-७५-३९५०-८०-४५९० या वेतनश्रेणीत महानगरपालिका आस्थापनेवर नियुक्ती देण्यास मान्यता देण्यांत येत असून येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यांत येते.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत वैती.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ३८ चे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

हायड्रोलिक शिडीसह वाहन खरेदी करण्याबाबत हे यामध्ये आहे का? नाकाडी साहेब हे कुठल्या बजेटमध्ये आहे?

**सुधिर नाकाडी :-**

वृक्षप्राधिकरणसाठी बजेटमध्ये तरतुद आहे.

**याकुब कुरेशी :-**

त्यासाठी हायड्रोलिक शिडी घेण्याची गरज मला वाटत नाही.

**गोविंद परब :-**

साहेब, झाडे वगैरे तोडायला शिडी लागते. तशा टाईपची शिडी घेणे आवश्यक आहे.

**याकुब कुरेशी :-**

तशी स्वस्त घ्या. हायड्रोलिक घेण्याची गरज मला वाटत नाही. एवढी महाग शिडी घेऊन तिला मेन्टेन कोण करणार? गाड्या आहेत का? आपल्याकडे मेन्टेन होते का? हायड्रॉलिक शिडी आहे.

**चंद्रकांत वैती :-**

त्याची किंमत किती आहे?

**मा. सभापती :-**

माझी प्रशासनाला विनंती आहे की, त्यांनी आपल्याला हायड्रोलिक शिडी भाड्याने आणावी, गॅरेजमध्ये पडण्यापेक्षा शिडी भाड्याने आणावी.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदयांचा प्रस्ताव अतिशय चांगला आहे.

**याकुब कुरेशी :-**

खरोखर भाड्याने आणलेली पत्करेल आणि ती शिडी परवडेल. ज्यावेळी आपल्याला आवश्यकता आहे त्यावेळी भाड्याने मागवून घ्यायची. वर्षातून पावसाळ्याला आपल्याला आवश्यकता भासते.

**मिलन म्हात्रे :-**

हे बघा, मागच्या वृक्षसंवर्धनच्या सभेमध्ये आपला जो अर्धा टक्का बजेट आणि एक कोटी बासष्ठ लाख महानगरपालिकेतर्फे वृक्षसंवर्धनला खर्च करावयाचा आहे. त्याकरिता जी सगळी लागणारी अवजारे आहेत आणि वाहने आहेत. याचा साधकबाधक विचार करुन आयुक्तांच्या उपस्थितीमध्ये आपला हा ठराव मंजुर झालेला आहे. त्या सभेला आपण होतात. आपण नंतर आलात. विषय झालेला आहे. त्याच्या अगोदरचा आणि आपण तिकडे बजेटच्या तरतुदीमध्ये आपण होतात आणि ही जी तरतुद केलेली आहे. वृक्षसंवर्धन समितीच्या अर्थसंकल्पामध्ये जी सेपरेट खर्च करावयाची तरतुद आहे त्याकरिता या शहराकरिता आपल्या जी वाहने आता बी.एस.ई.एस.चे वाहन आपल्याला कशाला घ्यायला लागेल? आणि ते किती दिवस देणार? महानगरपालिकेचे स्वतःचे वाहन असावे. ते आरोग्य विभाग, आरोग्य विभागानंतर वृक्षसंवर्धन आणि अग्निशमन या तिन्ही डिपार्टमेंन्टला वापरायला मिळेल. म्हणून आपण हा प्रस्ताव इथे आणलेला आहे.

**याकुब कुरेशी :-**

मला असे वाटते की, सभापती साहेबांनी जो निर्णय दिला आहे की, ज्यावेळी आपल्याला शिडीची आवश्यकता भासते त्यावेळी भाड्याने शिडी आणली तर अति उत्तम. ती आपल्याकडे मेन्टेनन्स आणि ती आणून ठेवून खराब होणार त्यापेक्षा आपल्याला आवश्यक तेव्हा भाड्याने घेऊन आलो तर बरे होईल.

**मिलन म्हात्रे :-**

हे बघा, तुम्हांला एक सांगतो. भाड्याने वगैरे नाही आहे. सभापती साहेब, हा विषय मजेशीर घेऊन चालणार नाही.

**दिनेश नलावडे :-**

सभापती महोदय, हा जो विषय आलेला आहे त्याच्यात तुमची सुचना अतिशय योग्य आहे. हे जे हायड्रोलिक शिडीसह, सन्मा. सादस्य मिलन म्हात्रे साहेब, हे बघा आपल्या शहरात कुठेतरी आपण पाच-सात वर्षे झाडे लावत आहोत. मुंबई शहरामध्ये महानगरपालिकेला फार मोठी, अवाढव्य अशी झाडे आहेत. त्या ठिकाणी शिडीचे वगैरे हायड्रोलिक मशीनची आवश्यकता आहे. आपले शहर आत्ताच कुठेतरी झाडा झुडपीत वाढत आहे. आपल्याला जेव्हा आवश्यकता असेल, जेव्हा झाडे मोठी होतील.

**मिलन म्हात्रे :-**

आमच्या भाईंदर वेस्टला भरपूर झाडे आहेत.

**दिनेश नलावडे :-**

आहेत. परंतु, एखाद दुसरे झाड आपल्याकडे आहे. तेव्हा आपण हा विषय पुढे ढकला आणि

**मिलन म्हात्रे :-**

पुढे कशाला ढकला? तुमच्याच तक्रारी आहेत. सगळ्यांची तक्रार वृक्षसंवर्धनमध्ये वाचली जातात. शांतीनगरपासून सगळ्या वृक्ष अधिकारी सांगा किती पत्र येतात?

**हॅरल बोर्जीस :-**

सभापती साहेबांनी सुचविलेल्याला विरोध नाही. आपण भाड्याने गाडी घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हांला कोण देणार? तुमच्या आस्थापनेवर ती गाडी पाहिजे.

**दिनेश नलावडे :-**

म्हात्रे साहेब आणि उपायुक्त केळकर साहेब, ज्या सभापती यांनी सुचना केलेल्या आहेत त्या आम्हांला सर्वांना मान्य आहेत. जेवहा आम्हांला आवश्यकता लागेल तेव्हा भाड्याने गाडी मागवावी आणि आम्ही हा विषय नामंजुर करीत आहोत.

**मिलन म्हात्रे :-**

सभापतींनी हेही सांगाव. भाड्याने गाडी मिळते किंवा नाही. बी.एस.ई.एस.ला दोन वेळा पत्र दिले आहे. तुम्ही आता विचार करा. नुसते बोलून मोकळे व्हायचे नाही.

**मा. सभापती :-**

प्रशासन बघेल कुठली गाडी आहे ती.

**मिलन म्हात्रे :-**

प्रशासन कशाला? बी.एस.ई.एस.ने दोन दिवसांकरिता घेतली. ती पण गाडी एक दिवस दिली असे होत नाही. वृक्षसंवर्धनने स्वतःचा ठराव करुन तुमच्याकडे मंजुरीला पाठविलेला आहे. त्या बजेटमधून ती गाडी तीन डिपार्टमेंन्टला उपयोगी पडणार आहे. असे नाही असे ती गाडी घ्यावी असा मी ठराव ठेवत आहे. प्रकरण क्र. ३८ ला माझे अनुमोदन आहे. याच्यावर निर्णय काय झाला?

**दिनेश नलावडे :-**

प्रकरण क्र. ३८ चा विषय नामंजुर करण्यांत आलेला आहे. त्याला अनुमोदन झालेले आहे. मी ठराव मांडतो, भाड्याने घ्या आणि हा विषय नामंजुर करण्यांत आलेला आहे. अनुमोदन दिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव नीट वाचून घ्या. कारण बघा, केळकर साहेब, तुम्ही दरवेळेला वाईट प्रसंगी गप्प बसता. तुमच्याकडे लोकांच्या अनेक तक्रारी आहेत.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

मी याच्यामध्ये गप्प बसत नाही. कारण की, वाहन विभागाची अवस्था मला माहिती आहे. ४०७ चे एक वाहन मागे सडत पडलेले आहे. त्या रिना मेहता ज्या होत्या त्यांच्या आग्रहाने आपण धूर फवारणीकरिता ते वाहन घेतले होते. ते इथे मागे सडत पडत आहे. ती अवस्था बघा आणि माझे मत आहे की, जर भाड्याने मिळत असेल तर त्याच्यासाठी आपण प्रयत्न करु.

**याकुब कुरेशी :-**

भाड्याने मिळते.

**मोहन पाटील :-**

या विषयावर सभापती महोदय आणि सन्मा. सदस्य दिनेश नलावडेजी आणि अन्य सर्व सदस्यांनी या ठिकाणी चांगला प्रस्ताव आणलेला आहे की, आपले मेन्टेनन्स खर्च करता येत नाही. म्हणून आपल्याला उपायुक्तांनीही सुचना दिलेली आहे. त्यामुळे आपण यापुढे वृक्षसंवर्धन समितीला सुद्धा विनंती करतो की, आपण भाड्याने गाड्या घ्या आणि झाडांची काटछाट सुरु करा.

**मिलन म्हात्रे :-**

गाड्या भाड्याने घ्या. म्हणजे त्या काही जीप आहेत का? ते विशिष्ट वाहन असते. आज बी.एस.ई.एस.चे तुम्हांला एक दिवस फक्त दिले.

**याकुब कुरेशी :-**

नंतर त्या प्रकारची वाहने भाड्याने मिळतात. शिडी वगैरे भाड्याने मिळते.

**मोहन पाटील :-**

बी.एस.ई.एस. आपल्याला सांगते.

**आसिफ शेख :-**

भाड्याने वाहन आल्यानंतर आपण सन्मा. सदस्य मिलनजी म्हात्रे ह्यांची पहिली तक्रार आल्यानंतर त्यांच्या तक्रारीची दखल घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यामध्ये आता ज्या सदस्यांनी सांगितले भाड्याने आणेल. तुमच्याकडे वृक्ष छाटणीच्या लेखी तक्रारी आलेल्या आहेत. सगळ्यांना कळवून टाका की, भाड्याने वाहन मिळेल तेव्हा ती वृक्ष छाटणी होईल. तुम्ही वेळ कशाला घालवता? एक-एक तास आपली त्याच्यावर चर्चा होते. प्रत्येक विषयावर सदस्य विचार करतो.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

ज्या ज्या वेळेला छाटणीचे विषय येतील त्या त्या वेळेला पंधरा दिवसाच्या आत छाटणी केली जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

ठिक आहे, असे सांगा. कारण प्रत्येक वेळेला नगरसेवकांची की, आमच्याकडे आजच्या आज झाले पाहिजे.

**प्रकरण क्र. ३८ :-**

हायड्रॉलिक शिडीसह वाहन खरेदी करणेबाबत.

**ठराव क्र. ४६ :-**

महानगरपालिकेच्या विस्तीर्ण पसरलेल्या परिसरात महानगरपालिकेने विविध प्रकारची झाडे रस्त्याचे दुतर्फा लावलेली असून काही झाडे फार वर्षापुर्वीची आहेत. काही ठिकाणी रस्त्याचे दुतर्फा रस्त्यांवर लावण्यांत आलेल्या विजेच्या दिव्यावर झाडांच्या फांद्या नियमित पसरत असतात. सदर फांद्या दिव्याखाली येत असल्यामुळे दिव्याखाली अंधार होवून रात्रीचे वेळी रस्त्यावर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे वेळोवेळी छाटणी करणे आवश्यक आहे. अशावेळी फांद्यांची छाटणी महानगरपालिकेच्या कर्मचा-यामार्फत करणे झाडांची उंची काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात असल्याने किंवा काही झाडांच्या फांद्या मोठ्या प्रमाणावर पसरलेल्या असतात व पुढे कमजोर असतात. अशा वेळी फांद्यांची छाटणी करणे धोकादायक ठरते. तसेच पावसाळ्यात झाडावर चढुन फांद्यांची छाटणी करणे शक्य होत नाही. म्हणून महानगरपालिकेचे विविध रस्त्याचे दुतर्फा लावलेल्या झाडांच्या धोकादायक / त्रासदायक फांद्यांची छाटणी तातडीने करणे करीता टाटा मॉडेल ४०७ टेम्पोवर हायड्रॉलीक शिडी लावून घेतल्यास शिडीमुळे तातडीने फांद्यांची छाटणी करणे सोईचे होणार असल्याने उद्यान व वृक्षसंवर्धन विभागास हायड्रॉलीक शिडी सह टाटा मॉडेल ४०७ हे वाहन खरेदी करणे आवश्यक असल्याने दि. १४/६/०४ चे वृक्षप्राधिकरण समिती सभेने ठराव क्र. २ अन्वये मा. स्थायी समिती सभेस मंजुरीस शिफारस केली आहे.

सन २००४-०५ चे अर्थसंकल्पात वृक्षारोपण कार्यक्रम या लेखाशिर्षा खाली रु. १.१५ लाखाची तरतूद ठेवण्यांत आली असून वृक्ष प्राधिकरण सभेच्या शिफारशी नुसार उद्यान व वृक्षसंवर्धन विभागास हायड्रॉलिक शिडीसह टाटा मॉडेल - ४०७ सहा चाकी वाहन खरेदी करणेंस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत असून संबंधित विभागाने (वाहन) कर्यवाही करावी. वरील विषयाबाबत सर्व सदस्यांनी चर्चा केल्यानंतर हायड्रॉलिक शिडीसह वाहन भाड्याने घेणेबाबत निर्णय घेण्यांत आला.

**सुचक :- श्री. दिनेश नलावडे.** **अनुमोदन :- श्री. हॅरल बोर्जीस.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ३९ चे वाचन केले.)

**आसिफ शेख :-**

प्रकरण क्र. ३९ ची टिपणी, गोषवरा नाही आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, जरा आम्हांला गोषवारा द्या.

**चंद्रकांत वैती :-**

या विषयातील जरा टिपण्या द्या.

**याकुब कुरेशी :-**

सभापती महोदय, या विषयी मागच्या वेळी हा जो सुरक्षा रक्षक नेमण्याबद्दलची ज्या निविदा आलेल्या आहेत. याच्या अगोदर आपल्या प्रशासनाने मला वाटते काही लोकांना ट्रेनिंगला पाठविले होते आणि त्या ट्रेनिंगला आज जवळपास सहा महिने झाले असतील. अजून ट्रेन झालेले नाहीत की, झाले त्याची जरा माहिती द्यावी.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, तुम्ही टिपणी आता दिली आणि तुम्ही आता विषय घ्या. सांगता तर हे कसे शक्य आहे? मग दरवेळेला असेच कराल. मग ते कसे करणार?

**याकुब कुरेशी :-**

चार दिवस पुढे कशाला पाठवता? त्याचवेळी तुम्ही द्या.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

टेंन्डर काढल्यानंतर हा विषय घेतला होता. आपण परवा टेन्डर फोडलेले आहे. परंतु, हा निर्णय आता घेतला नाही तर पाठीमागच्या माणसाला एक्स्टेन्शन करावे लागेल आणि नुकसान होईल.

**मोहन पाटील :-**

तुम्ही एक्स्टेन्शनच्या मागे लागू नका. निविदा बिलो अशी करुन टाका.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सोा.) :-**

ठराव मांडला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापतीच विचारतात काय चालले आहे? म्हणून विचारले. याचा अर्थ असा आहे, सभापतींचे लक्ष नाही.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सोा.) :-**

काय करायचे म्हणून विचारले आहे. सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेबांनी एवढेच सांगितले आहे की, कमीत कमी दराची निविदा मंजुर करा.

**मोहन पाटील :-**

कारण आपण मागच्या वेळी पाहिले की, एक्स्टेन्शन सुरु केले तरी सारखे चालू होत आहे. त्याची तारीखपण या ठिकाणी संपत आहे.

**आसिफ शेख :-**

कमी दराच्या ज्या निविदा आहेत त्या मंजुर. अनुमोदन.

**याकुब कुरेशी :-**

मागचा हा जो सुरक्षा रक्षक आहे. आपली जागा तो वापरत होता. त्याची सर्व थकबाकी कापून घेतलेली आहे का? आणि तो विचार केलेला आहे का? आणि तो विचार केल्यानंतर त्याला ह्याच्यावर फायनल हिशोब करावा.

**आसिफ शेख :-**

मागचे सगळे पैसे बाकी होते. ते कापून घेतले का?

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य महेंन्द्रसिंग साहेबांना विचारा.

**आसिफ शेख :-**

तुम्ही तक्रार केली ना. ते आपले पालिकेचे जुने कार्यालय वापरत होते. वसुली महत्वाची आहे.

**प्रकरण क्र. ३९ :-**

सुरक्षा रक्षक नेमणेच्या निविदेंस मंजुरी देणेबाबत.

**ठराव क्र. ४७ :-**

dO.sakaL yaa vaR<ap~at id.09.06.2004 raojaI p`isaQd kolaolyaa jaaihratInaUsaar mahanagarpailakocao maalama<aa saMrxaNaa kamaI h%yaarIÀivanaa h%yaarI saurxaa rxak purvaza krNaa¹yaa kMpnyaaÀsaMsqaa yaaMcao kDUna KalaIla p`maaNao inaivada p`aPt Jaalaolyaa Aahot. %yaacaa tpiSala puZIla p`maaNao.

| Sr. No. | Name of Agency | Rate Rs. | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Armed | | Unarmed | |
| | | Per Day | Monthly | Per Day | Monthly |
| 1 | 2 | 3 | | | |
| 1 | Bombay Intelligence & Security (Ind.) Ltd. | 163.16 | 4895.00 | 129.83 | 3895.00 |
| 2 | Sidharth Security | 150.00 | 4500.00 | 100.00 | 3000.00 |
| 3 | Central Investigation | 186.62 | 5598.72 | 108.86 | 3265.92 |
| 4 | Tiger Guard | 255.00 | 7650.00 | 190.00 | 5700.00 |
| 5 | Surendra Investigate | 200.00 | 6000.00 | 175.73 | 5272.00 |
| 6 | Vishal Protect force | 137.50 | 4125.00 | 129.17 | 3875.10 |
| 7 | Flash Security & Int. Service | 119.14 | 3574.20 | 105.20 | 3156.07 |
| 8 | Guru Security Service | 140.00 | 4200.00 | 130.00 | 3900.00 |
| 9 | Sainik Intelligence & Security Services | 133.20 | 3996.00 | 99.99 | 2999.70 |
| 10 | Sing & Shinal Pvt. Ltd. | - | - | - | - |
| 11 | Sainik Security Services | 155.50 | 4665.00 | 119.50 | 3585.00 |

varIla p`maaNao ekUNa Akra inaivada mahanagarpailakosa maudtIt p`aPt Jaalaolyaa AsaUna inaivada QaarkanaI

inaivadosaaobat puZIla kagadp~acaI inaivada ATISatI- p`maaNao jaaoDNao AavaSyak Aaho.

1.baayaao DoTa¸ 2.vaOya@tIk saurxaa rxak prvaanaa¸ 3.h%yaar p`iSaxaNa koMd` Aaho kaya¸ 4.ikmaana 150 poxaa AiQak saurxaa rxak purvaza kolyaa baabat.¸ 5. majaUr pUrvaza prvaanaa¸ 6. kMpnaI saurxaa rxak baaoDa-kDo naaoMdNaIkRt¸ 7. Aayakr ivavarNa p~ ³maagaIla tIna vaYaa-cao´ 8. vyavasaaya kr¸ 9. mauMba[- dukanao va saMsqaa AiQainayama Anvayao naaoMdNaI AavaSyak¸ 10.GIS/ESIC¸ 11.BaivaYya inavaa-h inaQaI ¸ 12.maajaI saOinakaMcyaa saMsqaosa p`aQaanya¸ 13. dr sava- kraMsahIt namaUd kravaot.

varIla ATISatI- p`maaNao tulanaa%mak t@ta pahta A.Ë .9 saOinak [nsToilajaonsa A^nD isa@yaUrITI saiva-saosa yaaMnaI saadr kolaolao h%yaarI eka saurxaa rxakacaa dr p`it maihnaa $.3996À¹ va p`it idna Aaz tasaasaazI $.133.20 pOsao Asaa Aaho. tr ivanaa h%yaarI saurxaa rxakacaa dr p`it maihnaa $.2999.70 pOsao va p`it idna $.99.99 pOsao saadr kolaa AsaUna manapanao maagaNaI kolaolyaa A%yaavaSyak sava- kagadp~acaI put-ta %yaaMnaI kolaolaI Aaho.

A.Ë.7 mao.Fla^Sa sao@yaUrITI A^nD [MnToilajaonsa saiva-sa yaa inaivada Qaark kMpnaInao eka h%yaarI saurxaa rxakacaa p`it maihnaa $.3574.20 pOsao va p`it idna Aaz tasaasaazI $.119.14 pOsao [tka p`aPt inaivada Qaarkat kmaI Aaho. tr ivanaa h%yaarI saurxaa rxakacaa dr p`it maihnaa $.3156.07 pOsao va p`it idna Aaz tasaasaazI $.105.20 pOsao Asaa Aaho. maa~ %yaaMnaI Anau. Ë.2¸ 3¸ 5¸ 12 yaa ATISatI- maiQala kagadp~acaI pUt-ta kolaI naahI. %yaamauLo mao.saOinak [nToilajaonsa A^nD sao@yaUrITI saivh-saosa yaaMcaI inaivada hI Anya BarIaolyaa inaivada Qaark yaaMcao poxaa kmaI dracaI zrto va baajaar BaavaaSaI tulanaa krta vaajavaI Asalyaanao %yaaMcaI inaivada maMjaUr krNyaat yaot AsaUna id.01.07.2004 pasaUna puZo ek vaYaa-cyaa kalaavaQaIsaazI id.30.06.05 pya-t mahanagarpailaka kLivala %yaa p`maaNao va krarp~atIla ATISatI- naUsaar h%yaarIÀivanaah%yaarI saurxaa rxak purvaza krNyaasa yaoNaa¹yaa Kcaa-sa AaqaI-k va p`SaasakIya maMjaUrI doNyaat yaot Aaho.

सुचक :- श्री. मोहन पाटील. अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

मा. सभापती,

स्थायी समिती सभा

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४० चे वाचन केले.)

**आसिफ शेख :-**

अवलोकनाचा विषय आहे ना. मग मंजुर आहे.

**चंद्रकांत वैती :-**

या विषयामध्ये वॉचमनला केबीन बांधण्यासाठी जो विषय आहे. त्याच्यामध्ये वॉचमनच्या केबीन अतिरिक्त दुसरे काही काम अवलोकनामध्ये आहे का?

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, जुने आहे. डोंगरी, पाली येथे पंम्पींग चालविणे. हे मागच्या वर्षी किती होते? आणि आता किती मध्ये गेले? ते माहिती पडले पाहिजे.

**एस. के. दशोरे :-**

मागच्या वेळी त्रेचाळीस हजार शंभर रुपये पर मन्थप्रमाणे होते आणि आता एकाहत्तर हजार रुपये पर मन्थप्रमाणे आपण घेतलेले आहे. आता ह्याच्यामध्ये जे डे टू डेला मटेरियल लागतात ते टोटल मटेरियल पण आपण घेतलेले आहे.

**धनराज अग्रवाल :-**

त्याच्यामध्ये नऊ टक्के अबव्ह घेतले आहे का?

**एस. के. दशोरे :-**

आपण निगोसिएशन करुन ०.५ टके बिलो.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब, ०.५ टक्के निगोसिएशन नसते. ०.५ टक्के निगोसिएशन असते का? मग प्रस्ताव दिला तर चांगले होईल. मग निगोसिएशन कमी करुन आणले पाहिजे. पाच टक्के असे.

**एस. के. दशोरे :-**

मग ते तेरा टक्के कमी कमी झाले. नऊ टक्के जादा दराने होते. आता ०.५ टक्के बिलोने करतो.

**धनराज अग्रवाल :-**

डिले नाही केले तर ठिक आहे.

**एस. के. दशोरे :-**

साहेब, खाली बघा. आपण खाली लिहिले आहे.

**धनराज अग्रवाल :-**

त्याने ०.५ टक्के कमी करायचे म्हणजे याचा काय अर्थ झाला?

**एस. के. दशोरे :-**

आता जो एस्टिमेटेड कॉस्ट आहे. त्याच्यात ०.५ टक्के दराने कमी करणे. म्हणजे साडे नऊ टक्के कमी झाले.

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या वेळेला आपण तुमचे विषय परत पाठविले होते. त्यावेळेला गोषवाऱ्यामध्ये जास्त किंमती का दिलेल्या आहेत? इतर महानगरपालिकांमध्ये पदाधिकाऱ्यांवर कारवाया झालेल्या आहेत. मी परत सांगत आहे. तुम्ही गोषवाऱ्यामध्ये तिथे दिले आहे का? की, ही जास्त रक्कम आम्ही का स्विकारतो आहे? पाईपचे रेट वाढले. मटेरियलमध्ये रेट वाढले. ट्रान्सपोर्टेशन वाढले. मार्केटमध्ये हा रेट गोषवाऱ्यात काहीही दिलेले नाही. फक्त जास्त दराने.

**एस. के. दशोरे :-**

आपण जास्त दर स्विकारतच नाही. साहेब आपण कमी दर करतो. खाली वाचा.

**आसिफ शेख :-**

वाचा ना. ०.५ टक्के कमी करणेस संमतीपत्र दिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही संमतीपत्र कशाला घेता?

**आसिफ शेख :-**

वाटाघाटीला बोलवतात ना?

**मिलन म्हात्रे :-**

वाटाघाटी कशाला करता? सरळ रिजेक्ट करुन टाका. ही काय नवीन पद्धत सुरु केली आहे. तेच मला कळत नाही. वाटाघाटी कोणाची होते. ज्याचा रेट कमी आहे त्याला नाही. तिसऱ्याला बोलावतो.

**मोहन पाटील :-**

हा अवलोकनाचा विषय आहे. चर्चा करा.

**मिलन म्हात्रे :-**

अवलोकनाचा अर्थ काय? अवलोकनामध्ये चर्चा करायला पाहिजे. आयुक्त काहीही पाठवतील. मग विषय घेऊच नका. मग आयुक्त बोलतील. तुम्ही विषय पास केला म्हणून.

**आसिफ शेख :-**

सुचक मी आहे आणि अनुमोदन सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती साहेबांनी केलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आयुक्त उद्या काहीही पाठवतील आणि तुम्ही लगेच मंजुऱ्या द्याल का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब अवलोकनासाठी येणाऱ्या विषयाची यापुर्वीही आपल्या सभागृहामध्ये चर्चा झालेली होती. त्यासंबंधी आयुक्त हे पुर्णपणे जबाबदार असतात. काहीतरी पाठवता हा शब्द योग्य नाही आहे.

**मिलन म्हात्रे :-**

अवलोकनाला आले हे तर आम्हांला सभागृहामध्ये बोलायची पण चोरी आहे का? चर्चा होत नाही का त्याच्यावर? आम्हांला त्याच्यावर चर्चा करायची आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

आपल्यासमोर संपूर्ण अहवाल सादर केला आहे. काहीतरी पाठवतील हा शब्द योग्य नाही आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही चर्चा करु शकतो. सभा लावली आहे. काय घाई असेल तर आम्ही निघून जाऊ शकतो.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

तुम्ही जरुर चर्चा करु शकता.

**मोहन पाटील :-**

साहेब, असा प्रश्न आहे की, काहीतरी आणतील, काहीतरी करतील.

**याकुब कुरेशी :-**

अनुमोदन झालेले आहे. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ४०:-**

मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. ४८ :-**

मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेल्या प्रस्तावांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम | ठेकेदाराचे मजूर संस्थेचे नांव |
|---|---|---|---|
| १ | फाटक जलकुंभाजवळील संरक्षक भिंतीची दुरुस्ती व उंची वाढविणे | ३,९६,३७७/- | निळकंठ मजूर कामगार सह. सं. म. |
| २ | अस्मिता पार्क, काशी व मिरा येथील उंच टाकीजवळ वॉचमन केबीन बांधणे | ३,५८,२८१/- | परिश्रम मजूर कामगार सह. सं. म. |
| ३ | मिरा येथे मुंशी कंपाऊंड येथील उंच टाकीची दुरुस्ती करणे. | ४,९५,५८७/- | श्री मजुर कामगार सह. सं. म. वाडा कल्याण |
| ४ | काशी येथे ४०० मि.मी. व्यासाच्या | ४,९७,१९६/- | परिश्रम मजूर कामगर सह. सं. म. |

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम | ठेकेदाराचे मजूर संस्थेचे नांव |
|---|---|---|---|
| | बिडाच्या जलवाहिनीस सिमेंट क्रॉक्रीटचे आच्छादन करणे. | | |
| ५ | भाईंदर (प.) शास्त्रीनगर येथे जी. आय. जलवाहिनी टाकणे. | ४,९४,८००/- | जनता मजूर कामगार सह. सं. म. उल्हासनगर |

दि. २२/०५/२००४ रोजीच्या दै. सुरज प्रकाश मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार खालील कामाकरीता ठेकेदारांनी दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | ठेकेदाराचे नांव | दर |
|---|---|---|---|---|
| १ | डोंगरी, पाली व लाईट हाऊस येथील पंपींग स्टेशन चालविणे व देखभाल / दुरुस्ती करणे (वार्षिक) | ८,७३,७४५/- | १) मे. साईवीणा एन्टरप्रायजेस | ९% जादा दराने |
| | | | २) मे. सुवर्णा इलेक्ट्रीकल्स | ११.५०% जादा दराने |
| | | | ३) मे. भोला इलेक्ट्रीकल्स | १३% जादा दराने |

उपरोक्त निविदांपैकी मे. साईवीणा एन्टरप्रायजेस यांचे दर सर्वात कमी असले तरी वाजवी व रास्त नसल्याने त्यांना वाटाघाटीसाठी बोलविले असता. त्यानी ०.५% कमी दराने कम करणेस तयार असल्याचे लेखी संमतीपत्रक दिलेले आहे.

सबब उपरोक्त मजूर संस्थांचे व इतर प्रस्तावांचे मा. स्थायी समितीने अवलोकन केलेले आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४१ चे वाचन केले.)

**आसिफ शेख :-**

हा जो विषय विषयपटलावर आलेला आहे. प्रकरण क्र. ४१ मिरा भाईंदर महानगरपालिका मा. स्थायी समिती सभा दि. २२/०१/२००४.

**मिलन म्हात्रे :-**

ठरावाबद्दल काय?

**आसिफ शेख :-**

तुम्ही ठराव दिलेला आहे. याचा आपल्याला धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत पुर्नविचार करायचा आहे.

**चंद्रकांत वैती :-**

याच्यामध्ये सन्मा. सदस्य शरद पाटील यांची सुचना होती. त्या सदस्यांच्या सुचना घ्याव्या. मग आपल्याला ठरावामध्ये काय करता येईल? ठराव दिला होता आणि ठराव काय अयोग्य आहे अशातला भाग नाही. फक्त त्या नगरसेवक निधीचा खर्च करतांना किती नगरसेवकांची नांवे टाकली जावी. टाकली जावीत की, नाही असा प्रश्न सन्मा. सदस्य शरद पाटील यांनी उपस्थित केला होता की, जो नगरसेवक आपला निधी खर्च करेल त्याचेच नांव पाहिजे असा ठराव तुम्ही सांगितला होता.

**आसिफ शेख :-**

बरोबर आहे. आता ठराव विषय पटलावर आला तर त्यामध्ये आपला असा नियम आहे की, आपण जर कोणताही ठराव एखाद्या वेळी पारित करतो. तर त्याचा फेरबदल करायचा असेल, काही

दुरुस्त करायचा असेल तर मला वाटते काही अवधी बी.पी.एम.सी. ॲक्टमध्ये निश्चित केलेला आहे. किती महिने? सहा महिने की, तीन महिने?

**दिपक खांबित :-**

तीन महिने.

**आसिफ शेख :-**

तीन महिने पुर्ण झालेले आहेत. आता ज्या सन्मा. सदस्यांच्या सुचना आहेत त्या विचारात घेऊन

**दिपक खांबित :-**

मागच्या वेळेला अशी सुचना होती की, नगरसेवक निधीचे जे काम आहे त्याच्यावर त्या नगरसेवकाचेच फक्त नांव पाहिजे आणि इतर पार्टीचे नांव

**शरद पाटील :-**

पदाधिकारी त्यांची सर्वांची नांवे येतील आणि जो नगरसेवका जो निधी वापरेल. त्या नगरसेवकाचे त्याच्यावर नांव आले पाहिजे. त्याची इच्छा असेल तर तो तिन्ही याची टाकू शकतो. ज्यांची इच्छा असेल तो टाकू शकतो.

**आसिफ शेख :-**

इच्छा असेल तर त्याचे प्रत्येक वेळी पत्र घ्यायला लागेल. त्यामध्ये अशी दुरुस्ती करु घ्या की, नगरसेवक निधी मग तो कोणत्याही नगराचा किंवा प्रभागाचा आपण निधी दिला तर त्याबद्दल तसे पत्रच लिहून घ्यायचे. हा हा निधी आम्ही या या प्रभागासाठी स्वेच्छेने देत आहोत आणि त्या त्या ठिकाणी त्या त्या नगरसेवकांची नांवे लिहावीत असे लेखी पत्र दिल्यानंतर घ्यायचे. ते इकडे नमुदच करुन घ्या. ठरावात स्वेच्छेने नमुद करुन घ्या.

**शरद पाटील :-**

आम्हांला वाटले तरी आम्ही टाकू.

**आसिफ शेख :-**

तसे पत्रच द्यायचे.

**याकुब कुरेशी :-**

विषय क्र. ४१ याला माझी अनुमती आहे. हा ठराव मंजुर करतो.

**शरद पाटील :-**

स्वेच्छेने आम्ही पत्र देऊ.

**आसिफ शेख :-**

चला मंजुर.

**शरद पाटील :-**

या ठरावामध्ये जो नगरसेवक निधी वापरेल त्याचे नांव येईल. वरची सगळी नांवे येतील आणि आम्हांला स्वेच्छने वाटले तर तीन-चार नगरसेवकांचीसुध्दा नांवे टाकू असा ठराव करतो.

**रिटा शाह :-**

ह्याच्यामध्ये क्लिअर करा. कारण परत कन्फ्युझन होणार की, ज्या नगरसेवकाचा निधी वापरला गेला असेल तर तो स्वतःचे नांव टाकणार आणि बाकी आमदार, खासदार यांचे टाकणार. बाकीचे नगरसेवक म्हणजे त्या प्रभागातीलच फक्त, बाकी इतर प्रभागातील स्थानिक नगरसेवक बोलणार माझा निधी आहे म्हणून त्या प्रभागातील नगरसेवकांचे नांव टाका असे नाही. प्रभागामधून निवडून आलेले त्यांचेच फक्त त्यांच्या पार्टीचे सांगत असतील ते टाकायचे तर टाका.

**शरद पाटील :-**

याच्यामध्ये तुम्ही आता कन्फ्युझन करु नका. जर एखाद्या नगरसेवकाने दुसऱ्या प्रभागातसुध्दा काम केले तर?

**रिटा शाह :-**

तुमच्यामधून दोन बाकीचे नगरसेवक निवडून आले. त्यांचे नांव टाकण्याबद्दल वाद चाललेला आहे की, संपूर्ण मिरा भाईंदरचा.

**शरद पाटील :-**

संपूर्ण मिरा भाईंदरचाच विषय आहे. साहेब, तुम्ही आता जो नगरसेवक निधी दोघांचा म्हणजे दुसऱ्या नगरसेवकांचा वापरता आहात. तुम्ही तिथे त्यांचे नांव टाका.

**मोहन पाटील :-**

आपल्या प्रभागातील असतील तर त्यांचे स्वेच्छेन नांव टाकायचे. आपण प्रभाग सोडून दुस-याचे का टाकायचे?

**शरद पाटील :-**

दुस-या ठिकाणी जर काम करायला गेलो तर?

**आसिफ शेख :-**

क्लिअर करुन घ्या.

**याकुब कुरेशी :-**

दुस-या प्रभागातील नगरसंवकांचे नांव टाकायचे नाही. त्याच भागातील नगरसेवकाचे नांव टाकायचे असेल तर?

**मोहन पाटील :-**

माझा विषय अलग आहे. त्या प्रभागातील नगरसेवकाने तिथे खर्च केला तर.

**शरद पाटील :-**

आम्ही जर उद्या तुमच्या प्रभागात काम केले. मी माझ्या निधीतून केले तर तिथे मला तुमचे नांव टाकायची गरज नाही.

**मोहन पाटील :-**

पण आमच्या प्रभागातील कामाचा प्रश्न येतच नाही. हे बोलणे चुकीचे आहे.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, आता समजा आमचे मित्र सन्मा. सदस्य शरद पाटील यांनी उदार मनाने निधी माझ्या प्रभागात दिला तर त्यांचे नांव टाकायला पाहिजे की नको.

**याकुब कुरेशी :-**

आमच्या प्रभागामध्ये ते कशाला टाकतील?

**आसिफ शेख :-**

त्यांनी उदार मनाने देऊन टाकले.

**मोहन पाटील :-**

तसे नाही. उदार मनाने असे नाही. आमची मान्यता पाहिजे. तुमच्या प्रभागात उदार मनाने देऊन सगळी कामे करु. तुम्हांला चालेल का?

**शरद पाटील :-**

नगरसेवक निधीमधून आम्हांला काम करायला काय हरकत आहे? आम्ही काम करु शकतो.

**मोहन पाटील :-**

हा वादाचा मुद्दा होईल. ज्या ठिकाणी बी.जे.पी.चे नगरसेवक आहेत त्या ठिकाणी राष्ट्रवादीच्या नगरसेवकांनी काम केले आणि त्यांनी त्यांचे नांव दिले तर हा वादाचा मुद्दा आहे. ज्या ठिकाणी राष्ट्रवादीचे नगरसेवक आहेत आणि तिथे बी.जे.पी.च्या माणसांनी काम केले. तर ते अयोग्य होईल.

**आसिफ शेख :-**

म्हणून मी मागच्या वेळी सांगता होतो. सन्मा. सदस्य महेंन्द्रसिंग चौहाणजीने आपला निधी खर्च केला होता. त्यांनी तिघांची नांवे टाकलेली.

**मोहन पाटील :-**

पण ते करु शकतात ना.

**दिनेश नलावडे :-**

सभापती साहेब, हा जो नगरसेवक निधी आहे. हा नगरसेवक निधी प्रत्येक नगरसेवकांनी आपापल्या प्रभागामध्येच वापरायला पाहिजे. याच्यामुळे आजही दुस-या ठिकाणी त्रास होत आहे.

**मोहन पाटील :-**

विद्यमान सदस्य का विधानसभेमध्ये खर्च करतात आणि जे विधानपरिषदेचे आमदार असतील ते संपूर्ण महाराष्ट्रामध्ये करतात.

**दिनेश नलावडे :-**

केळकर साहेब, नगरसेवकांनी आपला निधी त्यांच्याच प्रभागामध्ये वापरावा.

**आसिफ शेख :-**

स्वेच्छा निधी असतो. स्वेच्छा निधीचा अर्थ कुठेही वापरा.

**शरद पाटील :-**

स्वेच्छा निधी आम्ही कुठेही वापरु शकतो.

**आसिफ शेख :-**

आम्हांला मोठ्या मनाने द्या. आम्ही चांगल्या ठिकाणी तुमचा निधी वापरु.

**शरद पाटील :-**

तुम्ही कसे वापरणार? आम्हीच वापरणार.

**आसिफ शेख :-**

आमच्याकडे दिला तर आमची नांवे त्यावर येतील. ठराव तसाच केलेला आहे की, नगरसेवक निधीमध्ये नांवे दिली आहेत. ज्या प्रभागाच्या नगरसेवकाचे नांव येणार आहे. तसा ठराव झालेला आहे. शिवमुर्ती नाईक साहेबांचा नगरसेवक निधी माझ्या प्रभागात वापरला. शिवमुर्ती साहेबांच्या नगरसेवक निधीचे काम झालेले आहे. कोणत्या प्रभागात झालेले आहे? तर सन्मा. सदस्य आसिफ शेख यांच्या विभागात. तर आमच्या तिघांची नांवे येतील.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

सभापती साहेब, मुळात वॉर्ड हा निवडणुकीसाठी निवडून येण्यासाठी आहे. निवडून आल्यानंतर ते गावचे नगरसेवक झाले. म्हणजे ते कुठेही वापरु शकतात. परंतु, त्यांची इच्छा असेल त्यांच्या वॉर्डातच करायचे ते करु शकतात. परंतु, निवडून आल्यानंतर त्या वॉर्डापुरती बॉन्ड्री काम करण्यासाठी आहे. असा त्याचा अर्थ नाही आहे.

**मोहन पाटील :-**

साहेब, तुम्ही बोलात हे मला समजते. पण तुम्ही हे लिखीत करु नका. तुम्ही भांडणे लावण्याचे काम करतात. ही भांडणे लागतील.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

भांडणाचा संबंध नाही. मी तुम्हांला एक तत्व सांगितले.

**मोहन पाटील :-**

तुम्ही तत्व बोललात. तत्व मान्य आहे. परंतु, या तत्वाला लिखीत स्वरुप तुम्ही आणू नका.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

लिखीत स्वरुप आणत नाही. ज्या नगरसेवकांनी स्वतःचा निधी वापरुनच काम केले असेल तर त्यांचेच एकट्याचेच नांव द्यायचे की, नाही द्यायचे हे तुम्ही ठरवा. तिघांनी मिळून त्याच वॉर्डमध्ये काम केले असल तर तिघांची नांवे द्यायची की, नाही ते तुम्ही ठरवा.

**रिटा शाह :-**

आता सन्मा. सदस्य शरद पाटील यांचेदेखील कन्फ्युझन आहे. आपल्या सर्व सभागृहाचे याच्यामध्ये कन्फ्युझन आहे. आपला अगोदर कसा निर्णय झाला की, नगरसेवक निधीमधुन कुठल्याही नगरसेवकांनी काम करुन घेतले. त्याच्याबरोबर आमदार, खासदाराचे त्यांची इच्छा असेल तर नांव टाकायचे.

**शरद पाटील :-**

आमदार, खासदारांची नांवे टाकायची नाहीत. नगरपालिकेमधील महापौर, उपमहापौर, विरोधी पक्ष नेता, सभापती, सभागृह नेता, आयुक्त यांची नांवे टाकायची आहे. आमदार, खासदारांची आमदार खासदार निधीमधून जातील.

**रिटा शाह :-**

नगरसेवकांची इच्छा असेल की, आमच्या आमदाराचे नांव टाका तर त्याची इच्छा आहे आणि नगरपालिकेच्या कायद्यात बसत असेल तर.

**शरद पाटील :-**

कायद्यात नाही आहे.

**रिटा शाह :-**

पण मेन नगरसेवकांचे चाललेले आहे. नाईक साहेबांनी सांगितले ते मला आता चांगले वाटले. कारण आपण एखादे कुठल्याही विभागाचे काम घेऊन अधिकाऱ्याकडे जातो. नगरसेवक प्रभागामध्ये निवडून येतो. निवडून आल्यानंतर संपूर्ण मिरा भाईंदरची लोक त्याला कॉन्टॅक्ट करतात आणि

कुठल्याही विभागाचे काम त्या अधिका-याकडे घेऊन जाऊ शकतो. हे तुमच्या विभागाचे किंवा प्रभागाचे नाही असे बोलतात हे ते आज क्लिअर झाले आहे.

**शरद पाटील :-**

नाही. ते स्वेच्छा निधीतून बोलले आहेत.

**रिटा शाह :-**

ते पण बघून घ्या. कुठलेही डिक्लरेशन ऑफीसरचे असते ते कॉमन असते.

**शरद पाटील :-**

स्वेच्छा निधी शब्द त्यांनी वापरला आहे.

**रिटा शाह :-**

कायदा कायदा असतो. आपण आता विषय डायव्हर्ट करायचा नाही. आता विषय काय चालला आहे की, नगरसेवकाचे नांव. कुठल्याही नगरसेवकांनी आपल्या निधीमधून कुठल्याही विभागामध्ये काम करुन घेतले तर मला असे वाटते. ज्या नगरसेवकांनी काम करुन घेतले तर फक्त त्याच नगरसेवकाचेच नांव टाका. इतर लोकांचे टाकायला गेले तरी प्रॉब्लेम निर्माण होणार.

**शरद पाटील :-**

बरोबर आहे. मी तुमच्या मताशी मी सहमत आहे.

**मोहन पाटील :-**

बरोबर आहे असे नाही. बरोबर कसे आहे? जर बीजेपीच्या प्रभागामध्ये काँग्रेसचा प्रभाग आहे. सन्मा. सदस्या रिटा शाह त्यांच्याकडे दोन राष्ट्रवादी काँग्रेसचे सदस्य आहेत आणि त्या ठिकाणी जर बीजेपीच्या तीन नगरसेवकांना तीन टप्प्यामध्ये काम करायचे सुरू केले. बाजुचे नगरसेवक बीजेपीचे आहेत. त्यांनी सांगितले त्या प्रभागामध्ये आम्हाला काम करायचे आहे. एका बाजूने सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल यांनी केले, एका बाजूने सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांनी काम केले आणि एका बाजूने सन्मा. सदस्य डॉ. जैन यांनी त्यांच्या प्रभागामध्ये काम केले. तीन टप्प्यामध्ये तीन भागात काम केले आणि तुम्ही त्यांची नांवे लावून ठेवली. त्या प्रभागामध्ये काँग्रेसचे तीन नगरसेवक आहेत. मग त्यांचे काय काम आहे? मग आम्ही उद्या सुरू केले रणनीती सुरू केली. ज्या ठिकाणी भाजपचे नगरसेवक आहेत.

**दिनेश नलावडे :-**

आम्ही तुमच्या मताशी पूर्णपणे सहमत आहोत.

**मोहन पाटील :-**

आम्ही जर असा विचार केला की, जेवढे बीजेपीचे वार्ड आहेत. तेवढे काँग्रेसचे आले की नाहीत आणि आम्ही राष्ट्रवादीचे काम सुरू केले आणि कार्यक्रम केले. आम्ही गोषवारा तयार केला तर पॉलिटिकली वातावरण खराब होईल. जर आज आमचे बावन्न उमेदवार आहेत. बावन्न उमेदवार काँग्रेसचे आणि एकोणीस उमेदवार आणि चार म्हणजे तेवीस उमेदवार बीजेपीचे आहेत. बीजेपीच्या सगळया वॉर्ड मध्ये आम्ही मोर्चे बांधणी केली आणि आज जर आम्ही त्यांचे सगळे वॉर्ड बांधण्याचा प्रयत्न केला. तर त्या ठिकाणी राजकिय वातावरण कसे होईल? बावन्न वॉर्ड आहेत, आम्ही आहोत, सभागृहामध्ये दुसरे उमेदवार आहेत.

**दिनेश नलावडे :-**

माजी सभापती मोहन पाटील बोलेले हा मुद्दा तंतोतंत खरा आहे. ह्याच्यामुळे वातावरण दुषित होणार आहे. आणि ह्या वेळेला आम्ही तिन्ही नगरसेवकांनी निश्चित केलेले आहे. आम्ही निधी दुसरीकडे प्रभागामध्ये टाकू. ह्या नियमामुळे या वर्षी फार मोठा त्रास होणार आहे. अशाचप्रकारचे झगडे होणार आहेत. आपण लक्षात ह्या नगरसेवकांचा निधी तयाच प्रभागामध्ये वापरावा. कारण आमदाराचे असेच प्रकार गेल्या वर्षी झालेले आहेत. त्याच्यामुळे मारामारी होण्याची संभावना झाली होती. हे जे बोलले आहे तर त्यांची भाषा रास्त आहे. सर्वांसाठी असेल दुसरे नगरसेवक आमच्या प्रभागामध्ये आले. आम्ही दुस-या प्रभागामध्ये जाऊ.

**शरद पाटील :-**

तुम्हाला दुस-या प्रभागामध्ये जायला हरकत नाही. तुम्ही कुठलेही काम करायचे असले तरी पाटया सगळया कामावर लागल्या जात नाही आहेत. गटाराचे काम केले त्याच्यावर पाटी लागली जात नाही. रस्त्याचे काम केले त्याच्यावर पाटी लागली जात नाही.

**मोहन पाटील :-**

आम्ही पाटी लावू आम्ही आमच्या नगरसेवकांचा निधी वापरू.

**मा. सभापती :-**

काम करीत असलेल्या सर्व नगरसेवकांना पाटी लावण्याचा प्रश्न येत नाही. आपापले फलक असताना ते आपापल्या वॉर्ड मध्ये लावायचे ते लावा. काय काय काम सांगतात ते लिहून घ्या.

**हॅरल बोर्जीस :-**

सभापती महोदय, एकीकडे सदस्य बोंबाबोंब करतात की, आमच्या प्रभागातील कामे होत नाहीत आणि हे सदस्य स्वतःचा स्वेच्छा निधी दुसरीकडे वापरायला निघाले आहेत.

**चंद्रकांत वैती :-**

सभापती साहेब संपूर्ण शहरामध्ये नगरसेवकांच्या माध्यमातून नगरसेवकांनी निदर्शनास आणलेली कामे महापालिका करीत असते. निव्वळ नगरसेवकांनी आणलेली नाही तर काही नागरीकांनी स्वतःहून अडचणी सांगितल्या नंतर महापालिका ती कामे करीत असते. आपल्याकडे आज निधी आहे म्हणून आपण तो वापरतो. निधी सव्वा दोन लाखाचा आहे. पण त्यासाठी आपल्याला एवढया मोठ्या गोष्टी करण्याची आवश्यकता नाही. आपण जर अशाच महानगरपालिकेच्या बांधकाम खात्याला किंवा संबंधित खात्याला सांगितले की, अमुक ठिकाणी अमुक अडचण आहे. तर नगरसेवकांचे निधी नाही. म्हणून काम होणार नाही असे झालेले नाही मात्र आपला निधी नगरसेवकांकडे असतात. हा प्रभाग आहे. ह्या प्रभागामध्ये तीन नगरसेवक मिळून त्या प्रभाग क्षेत्राला काय देता येईल? हे महत्वाचे आहे आणि जर त्या तिन्ही लोकांनी मिळून तो निधी वापरला असेल तर त्या तिन्हीची नावे लावावी. एखाद्या नगरसेवकांने जर स्वतःचा निधी लावला असेल तर जी प्रमुख पदाधिकारी आहेत. त्याची नावे आणि संबंधित नगरसेवकाचे नाव लावावे आणि शक्यतो अलिखित असा नियम आणि प्रोटेशन पाळावे. ज्यांनी त्यांनी आपापल्या प्रभागात काम केले तर ते अधिक चांगले राहिल आणि जे स्वीकृत सदस्य आहेत त्यांना तो स्वेच्छा निधी संपूर्ण शहरात कुठेही वापरता येतो जसे सन्मा सदस्य मोहन पाटील साहेबांनी सागितले की, आमदार आपापल्या क्षेत्रात काम करीत असतो मात्र विधानपरिषद सदस्य हा स्टेटमध्ये कुठेही आपला निधी वापरत असतो. अगदी सरळ गोष्ट आहे. पंरतु आपण उगीच त्याला काहीतरी विकृत स्वरुप देत आहोत. आपला विषय असा होता की, आपण कोणाकोणाची नांवे लावायची आहेत. त्या त्या प्रभागातील नगरसेवकांची ज्याचा निधी असेल त्यांचे लावावे आणि त्यांची इच्छा असेल तर दुस-यांची लावावी मी उदाहरण देतो की, माझ्याकडे आम्ही निधी खर्च केला आम्ही सगळयांनी नावे लावली. आमचे संपूर्ण पॅनल एका पक्षाने होते. तो स्वेच्छेचा प्रश्न आहे.

**नितीन ठाकूर :-**

हा स्वेच्छा निधी जो आहे. तो निधी आपण आपल्या इच्छेने वापरतो इच्छेकरीता जे काही नगरसेवक असतील त्यांची पण मंजूरी असेल तर उत्तम होईल. मग भांडण होणारच नाही. त्या स्थानिक नगरसेवकांना विश्वासात घेऊन बाहेरचा निधी आपल्या प्रभागामध्ये वापरण्याची संमती घ्यावी किंवा समजावे कसे?

**आसिफ शेख :-**

म्हणून सांगितले की तेव्हा संमती पत्र घ्या.

**दिनेश नलावडे :-**

नक्की निर्णय काय झाला?

**आसिफ शेख :-**

नगरसेवकांनी आपापला निधी आपापल्या प्रभागामध्ये वापरायचा.

**दिनेश नलावडे :-**

सभापती महादेय, याच्यावर निर्णय द्या नगरसेवक निधी आपापल्या प्रभागात वापरण्यात येणार काय? तुम्ही निश्चित करा.

**आसिफ शेख :-**

यांच्यामध्ये असे आहे की, प्रत्येक नगरसेवकांने आपापला निधी आपापल्या प्रभागात वापरायचा. स्वीकृत नगरसेवकांचा निधी वापरताना स्थानिक.

**रिटा शाह :-**

नगरसेवकांनी दुसऱ्या नगरसेवकांच्या प्रभागात वापरायचा नाही.

**आसिफ शेख :-**

स्वीकृत नगरसेवकांचा प्रश्न उपस्थित झालेला आहे.

**दिपक खांबित :-**

महानगरपालिकेच्या कोणत्याही भूमिपूजन, उद्घाटन कार्यक्रम आयोजित करताना निमंत्रण पत्रिका व नामकरण पाटी यावर नगरसेवक निधीतील कामे वगळता खालील नावे असावीत महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, प्रभागातील नगरसेवक आणि आयुक्त.

**मोहन पाटील :-**

याच्यामध्ये एक असे करा पुढे प्रभाग अध्यक्ष येणार आहे. ते पण करून घ्या.

**दिपक खांबित :-**

तसेच आमदार, खासदार निधीतून केलेल्या उद्घाटन शुल्कावर संबंधित आमदार, खासदार यांची देखील नांवे देण्यात यावीत. रूपये एक कोटी रकमेच्या वरील कामाच्या उद्घाटन शुल्कावर सर्व नगरसेवकांची नावे देण्यात यावी. वरील पदाधिकारी, अधिकारी यांची नावे प्रत्येक विकास कामाच्या निमंत्रण पत्रिकेवर, नामकरण फलकावर देण्यात यावीत. फकत नगरसेवक निधीच्या निमंत्रण पत्रिकेवर नामकरण फलकावर ज्या नगरसेवकांची निधी आहे. त्याचेच नाव देण्यात यावे सदर नगरसेवकांची इच्छा असल्यास प्रभागातील इतर नगरसेवकांचे नाव लिहिण्यात यावे प्रशासनाने यावर दक्षता घ्यावी.

**मोहन पाटील :-**

पुन्हा तुम्ही तेच बोलता. त्या प्रभागातीलच.

**दिपक खांबित :-**

या प्रभागातीलच नगरसेवकांची नावे घ्यावी. दुस-या प्रभागातील नाही.

**दिनेश नलावडे :-**

खांबित साहेब तुम्ही लिहिलेले का प्रत्येक नगरसेवकाचा निधी त्याच प्रभागामध्ये वापरायचा आहे.

**प्रकरण क्र. ४१:-**

मा. स्थायी समिती सभा दि. २२/०१/०४, ठराव क्रमांक १९२ बाबत फेरविचार करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ४९ :-**

imara¹Baa[-Mdr mahanagarpailaka h_It Anaok ivakasa ivaYayak kamao mahanagarpailakokDUna krNyaat yaotat. ivakasa kamaaMcaI BaUmaIpUjana va ]d\GaaTna samaarMBa yaasaMbaMQaI saat%yaanao pdaiQakarI va nagarsaovakaMkDUna naamakrNa paTIva$na vaad inamaa-Na haotao. vaadamaQyao ivanaakarNa p`Saasanaalaa laaokp`itinaQaI kDUna daoYa idlaa jaatao. vaastivak kaoNa%yaahI kaya-Ëmaacao Aayaaojana krtanaa krNyaapUvaI-naamakrNa paTIvar mauMba[- p`Mitk mahanagarpailaka AiQainayama 1949 cao klama 19¸ 19 ³A´¸ 19³1´ naUsaar mahapaOr¸ ]pmahapaOr saBaagaRh naota¸ ivaraoQaI pxa naota va klama 21 naUsaar saBaaptI¸ sqaayaI saimatI ho pd vaOQaainak djaa-cao pd Aaho. %yaamauLo sadrcyaa vaOQaainak pdacaI naavao naamakrNa flakavar AsaNao Ëmap`aPt Aaho. tsaoca jyaa p`BaagaamaQyao ]d\GaaTna va BaUmaIpUjana samaarMBa haotao %yaa p`BaagaatIla yaaca AiQainayamaacyaa p`krNa Ë.2 cao klama 5 naUsaar mahanagarpailaka p`BaagaamaQaUna bahusadsyaIya pQdtInao ekca p`Baaga tIna ikMvaa caar sadsya inavaDUna Aalaolao

Aaho. %yaaMcaI naavao hI namakrNa paTIvar AsaNao AavaSyak Aaho. Anaok ]d\GaaTna samaarMBaamaQyao pdaiQakarI va nagarsaovakaMcaI naavao naamakrNa flakavar nasalyaanao p`Sasanaasa ivanaakrNa AaraopÀp`%yaaraop k$na daoYa idlaa jaatao.

p`SaasanaakDUna Aalaolyaa p`stavaacaa ivacaar krta mahanagarpailakocyaa kaoNa%yaahI BaUmaIpUjana¸ ]d\GaaTna kaya-Ëma Aayaaoijat krtanaa inamaM~Na pi~ka va naamakrNaacaI paTI yaavar nagarsaovak inaQaItIla kamao vagaLta KalaIla maanyavaraMcaI naavao Asaaivat.

1´ maa.mahapaOr
2´ maa.]pmahapaOr
3´ saBaaptI¸ sqaayaI saimatI
4´ saBaagaRh naota
5´ ivaraoQaI pxa naota
6´ p`BaagaatIla tIna À caar hI nagarsaovakaMcaI naavao
7´ Aayau@t
8´ p`Baaga AQyaxa

tsaoca AamadarÀKasadar inaiQatUna kolaolyaa kamaaMcyaa ]d\GaaTna flakavar saMbaMiQat AamadarÀKasadar yaaMcaI naavao ilaihNyaat yaavaIt. $.1.00 kaoTI rkmaocyaa varIla kamaaMcyaa ]d\GaaTna flakavar sava- nagarsaovakaMcaI naavao ilaihNyaat yaavaI.

varIla pdaiQakarI va AiQakarI yaaMcaI naavao p`%yaok ivakasa kamaacyaa inamaM~Na pi~ka va naamakrNa flakavar ilaihNyaat yaavaIt. f@t nagarsaovak inaiQacyaa inamaM~Na pi~ka va naamakrNa flakavar jyaa nagarsaovakacaa inaQaI Aaho f@t %yaacaoca naava ilaihNyaat yaavao. sadr nagarsaovakacaI [cCa Asalyaasa p`BaagaatIla [tr nagarsaovakaMcao naava ilaihNyaat yaavao.  p`Saasanaanao yaabaabat dxata GyaavaI va sava- nagarsaovak¸ pdaiQakarI yaaMnaa sauQda yaa baabat Avagat kravao Asaa zrava parIt krNyaat yaot Aaho.

**सुचक :- श्री. शरद पाटील.** **अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४२ चे वाचन केले)

**चंद्रकांत वैती :-**

वासुदेव विष्णु शिरवळकर यांच्यावर पेणकरपाडा परिसरामध्ये कार्यरत असताना, क्षेत्रीय अधिकारी म्हणून काम करीत असताना पेणकरपाड्यामध्ये सव्वीस खोल्याचे बांधकाम सुरू होते आणि सदर बाब एका तिकडच्या महापालिकेच्या कार्यकर्त्यांनी निदर्शनास आणली आणि ते गाळे तोडण्याचे

आदेश काढण्यात आले आणि ते गाळे तोडले आणि नंतर पुन्हा पावसाच्या ह्याच्यामध्ये ते गाळे तयार होत असताना शिरवळकर हे महापालिकेतील क्षेत्रीय अधिकारी यांच्यावर दोन जबाबदाऱ्या होत्या. एक जबाबदारी म्हणजे अतिरिक्त जबाबदारी करवसुलीची होती आणि त्यावेळेला त्याच्यावर तसे दुर्लक्ष झाले. असा ठपका या विषयी निवृत्त अप्पर जिल्हाधिकारी रायकर साहेब यांच्या माध्यमातून चौकशी करण्यात आली. आणि संबंधित तक्रारदाराची देखील जबानी आणि साक्षी घेण्यात आली. आणि पाहिल्यांदा मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये एक चांगले काम आयुक्तयांच्या माध्यमातून म्हणजे अधिकाऱ्यावर कशा प्रकारे मी आपली शास्ती लागू करू शकतो किंवा त्यांनी कामामध्ये दिरंगाई केली, दुर्लक्ष केले, कचराई केली तर काय शिक्षा देऊ शकतो? हे सन्मा. आयुक्त साहेबांनी अतिशय प्रभावीपणे दाखवून दिले. मात्र, बी.पी.एम.सी. ॲक्टमध्ये जी प्रोव्हीजन आहे. त्याच्याप्रमाणे त्यांपी स्थायी समितीसमोर त्यांनी पुन्हा अपिल केलेले आहे आणि अपिल आपल्याकडे आलेले आहे. तर याच्यामध्ये आयुक्तांनी स्पष्ट आदेश दिलेले आहेत. सदर कर्मचाऱ्यांना जोपर्यत त्यांची सेवा आहे तोपर्यत त्यांना त्याच पगारावर हुद्यावर काम करावे लागेल त्यांची पद्दोन्नती होणार नाही. किंवा वेतन वाढ देखील होणार नाही या सगळया प्रकरणाचा आपण आपल्या अधिकाऱ्यांवर ठपका ठेवला त्यावेळेला ज्या कारणासाठी या खोल्या झाल्या. आता मिरा भाईंदर मध्ये विशिष्ट दर्जाची लोक राहातात. त्यांना नगरसेवक बनायचे आहे, नाही बनायचे आहे. समाजसेवा करायची आहे, करायची नाही माहिती नाही. पंरतु ती लोक कुठे कुठे अनधिकृत बांधकामे चालू आहेत. याचे अर्ज अगदी न विसरता सगळे फॅक्स करतात आणि कित्येक नगरसेवकांनी आपल्या तक्रारीदेखील केलेल्या असतात. या तक्रारी अनधिकृत बांधकामाच्या असतील तरी त्याला स्टे आहे किंवा अन्य कारण असे सांगून ते बिनदिकतपणे ती कामे होत असतात. पंरतु जे तक्रारदार आहेत. ह्यांनी फॅक्स केला की, लगेच आपली यंत्रणा धावते? ते मला अजून कळले नाही. यांच्या तक्रारीचे एवढे महत्व का आहे? पंधरा वर्षापासून एका हॉटेलचे उदाहरण देऊ इच्छितो की, त्याचा पावभाजीचा स्टॉल त्या गटाराच्या काठावर होता आणि त्यासाठी राठोड साहेब मी त्यांना चार वेळा सांगितले की, तो फार जुना आहे. तो रस्ता अशा प्रकारे झालेला आहे आणि गटाराच्या किनाऱ्याला आहे. मग आपल्याला ते फेरीवाले बसणारे त्रासदायक आहेत. मग ते उचलत का नाहीत? त्यांनी चार वेळा त्या ठिकाणी पाहाणी करायला घेतली. त्या हॉटेलवाल्याला मी सांगितले की, तुझे बाकडे आतमध्ये घे. पण अशी नगरसेवकांची, संगळयाची खंत आहे. आपण नगरसेवक तक्रार करतो तेव्हा त्यांच्यावर काही निर्णय होत नाही. पण एक फार चांगली उपाययोजना आयुक्तांनी याबाबतीत केली. पण मी म्हणतो यांच्यामध्ये दुबे नावाचा कोणीतरी ठेकेदार होता. मग त्या पेणकरपाडा परिसरात आज हजारो खोल्या झाल्या आणि दरवेळेला आपण त्याला विरोध करीत गेलो. महापालिकेने नोटीसी मारल्या. त्यांनी स्टे घेतले, नाही घेतले. पण त्यांची कामे राहीली मग महापालिकेने त्या ठेकेदारावरती, त्या दुबेवरती एम.आर.टी.पी. दाखल केली का? आपण आपल्या अधिकाऱ्यांना वेठीस धरलेले आहे. त्याच्यावर एम.आर.टी.पी. दाखल केली का? मग ह्याच्यावर काहीच कारवाई केली नसेल मग आपण दाखवून दिले. ह्याच्यामध्ये लोक राहायला लागले व लोक राहायला लागले म्हणजे त्यांचे कुंटुब राहायला लागले नाही. मग भाडेकरू कुठल्या विश्वासाने राहायला गेला की, त्यांना असेच कोणाला तरी कोंबून ठेवलेले आहे. याचा आपण खुलासा केला नाही. आता आपला कर्मचारी आहे. आणि सदर कर्मचाऱ्याला मी फार वर्षापासून ओळखतो आणि त्या कर्मचाऱ्याकडून कृत्ती झाली असेल. पण आयुक्त यांनी फर्मावलेली शिक्षा फारच जास्त मोठी आहे. म्हणजे त्याचे पुढील आयुष्य नक्कीच दुखमय होणार आहे. तर या विषयी सभागृहाने अगदी सर्वांनी व्यवस्थित मार्ग सुचवावा आणि कर्मचाऱ्यांना त्यांच्याकडून झालेली चुक आहे. त्यांच्यावर आपल्याला काय शिक्षा लादता येईल ती लादावी. पंरतु, त्यांच्या हा फार मोठा अन्याय होणार आहे. अशा अन्यायापासून त्याला परावृत्त करावे. सन्मा. आयुक्त या ठिकाणी बसलेले आहेत. त्यांनी आमच्या नाईक साहेबाबद्दल असे म्हटले होते की, त्यांनी म्युनिसिपल ॲक्ट घोळून प्यालेले आहेत. तर त्यांनी यावे योग्य तो खुलासा द्यावा. योग्य ते मार्गदर्शन करावे. जेणेकरून त्या कर्मचाऱ्यावर फार मोठा अन्याय होणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय, या सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती साहेबांनी जे सांगितले अतिक्रमण हे वेळीच काढले गेले पाहिजे ते. प्रशासनाचे महत्वाचे काम आहे. या संपुर्ण केसमध्ये जो आयुक्तांनी निर्णय घेतलेला आहे. मघाशी विषय निघाला सर्व शासकीय आदेशाचे शासन पत्रकाचे यामध्ये उल्लेख आहेत. परंतु एक महत्वाचा उल्लेख आहे. हे एक पत्रक आहे. ते पत्रक मी आपल्याला वाचून दाखवितो. ते सगळे म्हणतात आयुक्तांनी निर्णय लेखी घेतलेले असतात. याच्यामध्ये आयुक्तांपेक्षा ते जेष्ठ आहेत. ते

सचिव दर्जाचे अधिकारी आहेत. त्यांनी काही आदेश आयुक्तांना पण दिलेले आहेत. ते आयुक्तांचे आदेश खालच्या कर्मचाऱ्यापर्यंत गेलेले आहेत. असे आदेश जे कर्मचाऱ्यांनाच प्राप्त झालेले आहेत. ती कारवाई रोखण्यास त्या आदेशामध्ये सांगितलेले आहे. अशा आदेशाचा उल्लेख या शोकॉज नोटीसमध्ये किंवा श्री. रायकर हे कधी आले. आम्हाला काही माहिती नाही. आमच्या समितीची मंजूरी काम घेतलेले नाही आहे. म्हणजे आता त्यांनी घेतलेल्या निर्णयावर आम्ही निर्णय घ्यायचा. म्हणजे आपल्यापेक्षा ही लोअर ॲथॉरिटी आहे. लोअर ॲथॉरिटी अपॉइंट करताना आपली कुठेही परमिशन घेतलेली नाही आणि ह्या ॲथॉरिटीने जो निर्णय दिलेला आहे. हा संपुर्ण चौकशी कशी चुकीच्या पद्धतीने झालेली आहे आणि आयुक्तांचा आदेश म्हणजे मी त्या अधिकाऱ्याला वाचवा, अतिक्रमणे तोडू नका. ह्या मताचा मी नाही आहे. जे अतिक्रमण बांधले गेले त्यानंतर गेल्या सहा सात महिन्यामध्ये अतिक्रमण दुसऱ्या अधिकाऱ्याने का तोडले नाही? त्यांची बदली झाली आणि त्याच्याऐवजी भोळे नावाचा आता एक अधिकारी आलेला आहे. या अधिकाऱ्याने आजपर्यंत ते अतिक्रमण तोडलेले नाही आणि हे जे पत्र पाठविलेले आहे, त्याला आयुक्तसुद्धा बंधनकारक आहेत. यावर आयुक्तांनी लेखी खुलासा करावा. हा विषय आलेला आहे. अशा चुकीच्या पद्धतीने विषय कधीही पाठवू नये. मी ह्या मताचा आहे. दि. २५ जुन २००३ महाराष्ट्र शासन आणि रामानंद तिवारी प्रधानसचिव महाराष्ट्र शासन म्हणजे चीफ सेक्रेटरीने आपल्याकडे पाठविलेले आहे, आणि त्याच्यामध्ये त्यांनी दिले आहे. पावसाळयाला सुरुवात झाली असल्याने आता निवासी बांधकामाचे निष्काशन केल्यास रहिवाश्यांचे संसार उघड्यावर पडतील व त्यांचे हाल होतील. या प्रश्नामध्ये मानवतेच्या दृष्टीकोनातून पाहण्याची शासनास नितांत गरज भासत आहे. त्यामुळे या पत्रकाद्वारे पावसाळा असेपर्यंत म्हणजे सप्टेंबर २००३ अखेरपर्यंतच्या या ठिकाणी कुटूंबाचे वास्तव्य आहे. अशी अनधिकृत निवास बांधकामे निष्काशन करण्याची कारवाई तात्पुरती थांबवावी असे शासनाने कळविलेले आहे. आता हा आदेश प्रधान सचिवांचा आहे. तुमच्या चौकशी अधिकाऱ्याने जी काही चौकशी केली ह्याच्यात या आदेशाच्या तारिख आणि पत्राचा कुठेही उल्लेख नाही आहे आणि हा आदेश त्या अधिकाऱ्याला दिनांक ३/७/२००३ रोजी आपल्या महानगरपालिकेला प्राप्त झाले आणि हे सर्व प्रकरण हे आठव्या महिन्यात घडलेले आहे. त्यात तक्रारदारांनी पहिली तक्रार आपल्या महानगरपालिकेकडे दि. २६/८/२००३ ला आलेली आहे. शासनाचे पत्रक २५ जुन २००३ पासून तुम्हाला हे इनकोर्समध्ये पत्र आहे. म्हणजे कमिशनरनाच शासनाने आदेश दिलेले आहेत की, हे करू नये. आता आयुक्तांनी ते का करावे ? म्हणून नोटीस काढली आहे. आता ह्याच्यात कन्टेम्प्ट होणार आहे ते आपण नंतर बघु ह्याच्यावर कन्टेम्प्टसुद्धा होणार आहे. उद्या एखाद्या एक्स. वाय. झेड अधिकाऱ्याला आयुक्तांनी आदेश दिले. त्याने बिचाऱ्याने नेऊन तोडले. त्याच्यावर अपिल झाले हे आदेश असताना तु कारवाई केली म्हणून त्याला त्रास भोगावा लागणार आहे. पण ह्या आदेशाचे पालन करायचे की नाही करायचे? हेही आदेश आयुक्तांनी दिले पाहिले की ठिक आहे. हे आदेश आपल्याला प्राप्त झालेले आहेत. साध्य परिस्थितीत या आदेशाचे आपण पालन करू नये. हे देऊन त्याला क्लिअर तरी केले पाहिजे की, तोडायला मोकळा. मी जबाबदार आहे. तसे झालेले नाही. चौकशी अधिकाऱ्यांनी या आदेशाबद्दल काय सचिवांच्या आदेशाचे पालन त्या चौकशीमध्ये करायचे की नाही. कारण या संपुर्ण रिपोर्टमध्ये त्या अधिकाऱ्यांनी पहिल्या वेळेला ही सर्व बांधकामे तोडुन जमिनदोस्त केलेली आहेत. त्यामुळे त्यांनी कुठेतरी कर्तव्यात कसुर किंवा आपले उपायुक्त जे अतिक्रमण आहेत. त्यांनी त्याला चार शोकॉज नोटीस काढल्या का ? की, तु जाऊन ते तोडले नाहीस. त्यांनी तोडल्यानंतर तो जो सर्कमस्टेन्सेस झाला त्याच्यामध्ये हे शासनाचे पत्र सगळयांना प्राप्त झालेले आहे. प्रत्येक डिपार्टमेंटला हे बघा डिपार्टमेंटवाईस आले. दि. ३/७/२००३ ला वर आले आणि डिपार्टमेंटला १८/७/२००३ ला गेले म्हणजे शिवमुर्ती नाईकांना १८/७/२००३ रोजी प्राप्त झालेले आहे. हे असे पत्राचे शिक्के वगैरे सांगत आहेत. असे असताना प्रधान सचिवांचे आदेश डावलून आपला एखाद्या छोटा क्षेत्रीय अधिकारी रिस्क घेऊन काम करेल का? त्याला शासनाचे आदेश आलेले आहेत. या संपूर्ण चौकशी अधिकाऱ्यांमध्ये म्हणजे त्यांनी चुकीचे केले तरी साथ द्यावी या मताचा मी नाही आहे. सगळे तोडावे एकिकडून तोडु नये म्हणून आदेश आहेत. दुसरीकडे तोडल्यानंतर ते परत आले. त्याच्यानंतर ते तोडल्यावर सन्मा. सदस्य श्री. चंद्रकांत वैती साहेबांनी सांगितले तशी कुठेही एम्. आर. टी. पी. च्या केसेस झालेली नाही आहे. कारण आपल्याला त्याला आपल्याला प्रिनेटी ॲक्शन झाली पाहिजे. त्यानंतर आता त्यांनी जे काही टॅक्समध्ये कलेक्शन केले त्याच्यामध्ये आपण परत वाहवा करतो की, चांगल्या प्रकारे टॅक्सचे कलेक्शन झाले. त्याचे हे कामकाज आहे. आता आपल्याकडे एका कामगिरीला एक माणूस नेमलेला नाही आहे. प्रत्येकाला दोन-तीन-चार दिलेले आहे. त्यामुळे आपण

जसे सगळीकडे पुरे पडू शकत नाही. नगरपालिकेच्या वॉर्डमध्ये सगळया इमारतीमध्ये आपण पोहोचू शकत नाही. अधिका-यांना दोन-तीन वेळा जर चार्ज दिला असेल तर तो अधिकारी पोहोचू शकत नाही. ह्या संपुर्ण चौकशीच्या बाबतीत निर्णय देण्याकरीता आपल्याकडे जो विषय आलेला आहे. ह्याच्यामध्ये अन्वये मुंबई प्रांतिक अधिनियम ५६ नुसार लावलेली शास्ती योग्य आहे व ती कायम ठेवण्याची शिफारस आहे. आता रायकर साहेबांनी जर चौकशीमध्ये एवढी मोठी चुक केलेली आहे. बाकीच्या सर्व पत्रांचा उल्लेख आहे, ९३ चा सुद्धा आहे परंतु २००३ च्या पत्राचा कुठेही उल्लेख नाही आहे. या निर्णयामध्ये आपल्याला रायकर साहेबांनी जे अंधारात ठेवलेले आहृ ही कॉम्प्युटर ॲथॉरिटी आहे. त्यांनी या पत्राचा जरूर विचार करायला पाहिजे होता. कुठेतरी उल्लेख पाहिजे होता. पण तो नाही आहे हा निर्णय देत असताना आयुक्तांनी जो प्रस्ताव पाठवला आहे. हा आपण सरळसरळ परत पाठवावा आणि त्यांचे निलंबन किंवा जी काही शिक्षा आहे. थोडी नॉमिनल शिक्षा आपण करावी पण एवढी मोठी शिक्षा देऊ नये. शिक्षा ही अधिका-यांना तुम्ही द्या. वेतनामध्ये वगैरे काहीतरी करा. पण ह्या पत्रकाचा आपण जरूर निर्णय घ्या. नसेल तर पत्राची कॉपी मी आपल्याकडे देतो. आपल्याकडे असेल तर त्याचे व्यक्तव्य करा. की ह्याच्या बद्दल शासनाचा काय निर्णय आहे ? आणि त्याच्यात रहिवास दाखविलेला आहे. चौकशीच्या नोटीशी मध्ये ५६ ते १५ कुटूंबे राहत आहे हे चौकशी अधिकारी देखील बोलत आहे. आपण त्याच्यात दिले आहे की, मालक रहात असल्यास किंवा टेनन्ट राहत असल्यास असे या पत्रात कुठेही दिलेले नाही. जिकडे तुमचा रेसिडीन्शियल वावर आहेत घरात लोक राहतात. हे पाडू नये असे या पत्रामध्ये क्लिअर कट दिलेले आहे. त्याबद्दल चौकशी अधिका-याकडे कुठेही नाही आहे. आपण या सभागृहाचे पदसिद्ध सभापती आहात. महत्वाचा निर्णय आपल्याकडे आहे. पहिली टेस्ट केस आलेली आहे. आपण या टेस्ट केसमध्ये चौकशी कशी होते. हे आपणास सगळ्यांसमोर मी सांगत आहे. कारण आपण एखाद्या निकाल द्यावा. हे प्रकरण कोर्टात गेले तर हे कुठेही टिकणार नाही. ह्या ग्राऊन्डवर आपण हरू. ते. कर्मचारी जिंकतील आपली हार कोर्टात होण्यापेक्षा आपल्या कोटार्मध्ये त्या कर्मचा-याला चांगला निर्णय द्यावा हे प्रकरण वाढु नये याचा विचार करावा.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सभापती महोदय या ठिकाणी जो विषय या विषयपटलावर आलेला आहे. प्रकरण क्र. ४२, श्री. वासुदेव शिरवळकर यांचे अपिल अर्जाबाबत विचार विनिमय करणे. आपल्याकडे हा विषय कसा आला? आयुक्त साहेबांनी त्यांना निलंबित करून १९/५/२००४ रोजी शिक्षा बजावली आणि त्यांनी स्थायी समिती असल्यामुळे स्थायी समितीकडे अपिलावर निर्णय घेण्यासाठी हा विषय आलेला आहे. श्री. शिरवळकर यांच्याविरूद्ध महाराष्ट्र प्रादेशिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ च्या तरतुदी नुसार आयुक्त महोदयांनी त्यांच्यावर शिक्षा लादलेली आहे आणि त्या शिक्षेमध्ये त्यांनी शेवटच्या पॅरेग्राफमध्ये असे म्हटलेले आहे की, असे आदेश देण्यात येत आहेत की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२)(ब) नुसार पदोन्नती रोखुन ठेवणे व यात दक्षता रोध ओलांडू न देणे ही शिक्षा बजावण्यात येत आहे आणि आयुक्तांच्या या ऑर्डरवर सन्मा. आयुक्त यांची सही असेल, उपायुक्त मुख्यालय यांनी सही केलेली आहे. असे त्यांना पत्र दिलेले आहे. आता आता सगळ्या गोष्टी आपल्याकडे आहेत आणि ठिक आहे की, काम करताना कळत नकळत ब-याच चुका होत असतात. प्रशासन चालवित असताना जो प्रशासनाचा प्रमुख असतो. त्याला प्रशासन व्यवस्थितपणे चालले पाहिजे याची खबरदारी घ्यावी लागते आणि आपण म्हणतो मी मागच्या वेळी पण सांगितलेले आहे की, फुत्कारो लेकिन काटो मत। म्हणजे प्रशासनाचा धाक असला पाहिजे. पुन्हा सांगतो, फुत्कारो. म्हणजे साप असतो तो फुत्कारतो म्हणजे फक्त दंश करायचा नाही. फुत्कारो मगर काटो मत। त्या पद्धतीने खरे म्हणजे प्रशासन चालायला पाहिजे आणि आपल्याकडे चालते पण एखाद्याला आयुष्यातून उठवायचे मला वाटते की, सभागृहाची तशी भावना नाही. कोणताही अधिकारी शेवटी तो स्थानिक रहिवाशी आहे. स्थानिक नागरीक आहे आणि एखाद्याला असे आयुष्यातून बरबाद करणे त्यांनी त्या अपिलाकडे म्हटले आहे की, माझ्यावर फार अन्याय झालेला आहे. आयुक्त साहेबांनी जे अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२)(ब) चे पदोन्नती रोखून दक्षता रोध ओलांडू न देणे ही जी शिक्षा दिलेली आहे. सभागृहातील सन्मा. सदस्य चंद्रकांत वैतीजी आणि सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांच्या समर्थनासह संपुर्ण सभागृह याबाबत संमत असेल की, एवढी कठोर शिक्षा करणे योग्य होणार नाही. पण थोडीफार शिक्षा करावी जेणेकरून त्याला धाक बसला पाहिजे. त्या दृष्टीने स्थायी समिती सक्षम असल्यामुळे त्यांनी आपल्याकडे अपिल केलेले आहे. माझे या ठिकाणी असे मत आहे की, धाक बसावा त्या

दृष्टीकोनातुन आयुक्तांनी एवढी मोठी शिक्षा सुनावली आहे. त्यामध्ये थोडेफार रिलिफ केले पाहिजे माझे या ठिकाणी असे मत आहे की, महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) खंड(ब) नुसार फक्त पदोन्नती रोखण्याची शिक्षा देण्यात यावी.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यावर ग्राउन्ड काय आहे? कारण जी चार्टशीट ठेवलेली आहे तिच मुळात चुकीची आहे. तुमच्याकडे सिनियर ऑफिसर आहे आणि जो मंत्रालयात बसलेला प्रधान सचिव आहे तो तुम्हाला आदेश देतो आणि आयुक्त त्याच्यावर चार्टशीट वाजवतात आणि चौकशी अधिकारी काहीच करीत नाहीत. तुम्ही चार्टशीट कशी काय ठेवणार? लेबर कोर्टात पहिली चौकशी झाली तरी तुमचे प्रकरण उडेल तुम्ही काय सांगता?

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, तो प्रश्न नाही आहे. मला फक्त एकच बोलायचे आहे की, आपल्याकडील शिरवळकर यांचे आम्हाला दिलेले आहे की, श्री. वासुदेव शिरवळकर क्षेत्रीय अधिकारी यांच्या अपिलावर विचारविनिमय करणे आता आमच्याकडे दिलेले आहे. त्यावर शिंदे साहेबांची सही आहे. महत्वाचा तो प्रश्न आहे की, त्यांच्या अपिलाचे पत्र की काय? ते नगरसेवकांना दिलेलेच नाही तर आम्ही काय विचार करायचा?

**मिलन म्हात्रे :-**

१६ जुनला सभापतींना मिळालेले आहे. इकडे कॉपी आहे.

**रिटा शाह :-**

सभापतींना मिळालेले आहे. नगरसेवकांना मिळालेले नाही. स्थायी समितीच्या सदस्यांना मिळालेली नाही त्यांच्याकडे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हा निर्णय सभापतींनी घ्यायचा आहे. अपिल त्यांच्याकडे आहे.

**रिटा शाह :-**

अपिल त्यांच्याकडे आहे. पण अपिलामध्ये नेमके काय आहे ? कशासाठी आहे ? ती आम्हाला काहीतरी जाणीव असायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

गोषवाऱ्यामध्ये सगळे काही आहे.

**रिटा शाह :-**

गोषवाऱ्यामध्ये पुर्ण काही दिलेले नाही. त्यांची काय अपिल आहे ते दिलेले नाही. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब तुम्ही बोलत असताना मी माझ्या जवाबाची अपेक्षा करीत नाही. कारण सभापतींनी जबाब देऊ दे तुम्ही बोलत असताना तुम्ही आम्हाला थांबविता तेव्हा आम्ही गप्प बसतो. श्री. शिरवळकर यांचे जे प्रकरण आपल्यासमोर आलेले आहे. गुन्हा गुन्हा असतो. सजा सजा असते. परंतु सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती साहेबांनी जो या ठिकाणी मुद्दा मांडला की, शिरवळकर हा मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकमागे गुन्हेगार नाही. कारण मी एक नगरसेविकेच्या नात्याने मी देखील अनधिकृत बांधकामा बद्दल कमीत कमी शंभर पत्रे टाकलेली आहेत त्याच्यामध्ये जबाबदार कोण आहे? कोण नाही कुठे स्टे आहे. कुठे स्टे नाही कुठले ॲडव्होकेट आहे. कुठे व्हॅटक झाले, कुठे व्हॅटक झाले नाही. कुठले ॲडव्होकेट आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे सभापती आणि आयुक्त साहेबांना माझा एकच शेवटचा प्रश्न आहे की, आपल्याकडे झालेले अनधिकृत बांधकाम ते तोडल्यानंतर परत बांधून झालेले आहे. जसे गार्डन रिझर्व्हेशन असू दे, रोड रिझर्व्हेशन असू दे मग त्याच्या अंतर्गत आजपर्यंत आपण किती लोकांना शिक्षा केली? आणि कितीजणांची नगरसेवकांच्या माध्यमातून चौकशी केली? आता एक कुठल्या साध्या संस्थेने तुमच्याकडे ॲप्लिकेशन केले आणि त्याच्यावर आपण एवढी मोठी कार्यपद्धती वाजवली आहे ती योग्य आहे असे मला वाटते. गुन्हा केला की, तुम्हाला वाटते तो गुन्हेगार आहे. तुम्ही तुमच्या हिशोबाने शिक्षा करा. त्याबद्दल मी माझे मतैक्य देणारच नाही आणि शिफारसदेखील करणार नाही कारण कोण तुम्हाला प्रशासकीय अधिकारी म्हणून वाटत असेल की, हा आमचा गुन्हेगार आहे. त्यांनी गुन्हा केलेला आहे. तर तुम्ही तुमच्या हिशोबाने शिक्षा द्या. मला असे वाटते की, स्थायी समितीच्या शिफारशीची गरज नसते. दुसरी गोष्ट आहे की, जे शिरवळकर म्हणून क्षेत्रीय अधिकरी आहे तो गुन्हेगार आहे. त्याचा अर्थ त्यांनी एकदा ते बांधकाम तोडले आणि ते परत उभारले म्हणून क्षेत्रीय अधिकारी जेवढा त्यामध्ये गुन्हेगार आहे. तेवढाच तुमचा विभागीय

अधिकारी मुख्य अधिकारी त्याच्यावरचे, त्याच्या खालचे सर्वच त्यामध्ये गुन्हेगार आहेत. गुन्हा नोंदवायचा आणि सजा करायची तर सर्वांना लाईनमध्ये करायची फक्त एकाला सजा करून काय होणार नाही. करायची असेल तर परत झालेल्या बांधकामामध्ये तो एकटा जबाबदार नाही आहे. पहिल्या ग्रेडच्या ऑफिसर पासून खालच्या ग्रेडचा ऑफिसर हातोडा घेऊन तोडला तर सर्वच त्यामध्ये जबाबदार आहेत. नाहीतर परत बांधकाम उभारले ते एकामुळेच उभारले असे काही नसते. कारण सर्वांना माहिती असते तुमचे क्षेत्रीय अधिकारी त्या ठिकाणी फिरत असतात. तुमचे विभागीय अधिकारी आणि मुख्य अधिकारी देखील फिरत असतात. केसरीनाथ म्हात्रेंचा याच्यामध्ये उल्लेख आहे. त्यांना देखील माहिती आहे की ते पंधरा गाळे झालेले आहेत सजा करायची असेल तर सर्वांना करा करा किंवा नाही करा. त्याची मी माझी शिफारस देणार नाही आणि मी तसे हे करणार नाही. माझ्या त्याच्यामध्ये विरोधदेखील नाही आहे. जे आयुक्त साहेबांनी पाठविले आहे. ते गुन्हेगार आहे तर मला असे वाटते की, गुन्हेगार असेल तर सजा करा .

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, सभी लगबग पार्टी के लोगोने यहाँपर श्री. वासुदेव विष्णु शिरवळकर का यह विषय लिया। मेरे ख्याल से सभी एकमत है की, इतनी बडी शिक्षा नही होनी चाहिए। क्योंकी उसकी गलती थी। तो उसके उपर जरूर सभापती निर्णय लेगे की, कमसे कम उचित शिक्षा दी जाय। जादा शिक्षा न दी जाय।

**याकुब कूरेशी :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेजी के कहनेसे तो उसकी गलती नही है। फिर सजा किस चीज की।

**धनराज अग्रवाल :-**

गलती नही है। तो सजा मिलेगी नही। जो विचार करने को आया है। वही यहाँ पे विचार हो रहा है। गलती नही है। तो सजा नही मिलेगी यहॉ पे सब बडे बडे अधिकारी बैठे है। वो भी दिखेगे।

**आसिफ शेख :-**

प्रशासनाच्या मार्फत खुलासा करा.

**धनराज अग्रवाल :-**

मला एक विचारायचे आहे की, एवढे मोठे प्रकरण आलेले आहे. आता तरी ते गाळे तोडले का? आता कोण जबाबदार आहे? आता उभे आहेत की, तोडलेले आहेत. ते जरा मला सांगा.

**नितीन ठाकूर :-**

आता पण तोडले आहेत.

**धनराज अग्रवाल :-**

त्याची सजा कमी झाली पाहिजे. आम्हाला सगळे मान्य आहे. पण आता अजून जे गाळे तोडलेले नाहीत. त्याला जबाबदार कोण? कोण अधिकारी आहे बोला. जर एवढा मोठा विषय झाला आहे. त्याच्या आयुष्याची आपण वाट लावायला चाललो आहे.

**याकुब कुरेशी :-**

वाट लावायला चाललो नाही. प्रशासनाने वाट लावलेली आहे. त्याच्यामधून मार्ग काढणार आहोत.

**धनराज अग्रवाल :-**

अजून जर गाळे उभे असतील तर कोणाची सत्ता आहे.

**मोहन पाटील :-**

त्यांनी जे मागितले आहे ते उत्तर तुम्ही द्या.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

अजून तोडलेले नाही. आणि त्यांना सहा वेळा सांगितले आहे की, ते तोडून घ्या निवासी जागेमध्ये २६८ ची नोटिस दिलेली आहे. ते त्या सेक्शननंतरदेखील प्रभाग अधिकारी होते. आणि हे बांधकाम पुन्हा बांधलेले आहे ही गोष्ट आम्हाला नंतर निदर्शनास आली की, इव्हन ते गाळे झालेले आहेत. हा देखील रिपोर्ट नाही. तोडायला पाठविल्यानंतर तोडले. तोडल्यानंतर कधी उभे राहिले यांचेदेखील रिपोर्ट नव्हता. आम्ही माणूस पाठवून समजल्यावर आम्ही नोटीस काढली प्रत्यक्षात निवास झाला होता. निवास झाल्यामुळे तोडायचे २६८ खाली पोलिस घेऊन त्यांना बाहेर काढून तोडायचे

आहे. तोडूनसुद्धा तुमच्याकडे रिपोर्ट पाठवू. परंतु असा प्रश्न आहे की, हा जो विषय आलेला आहे. हा विषय म्हणजे त्यासंबधी ज्यांना शिक्षा झाली. त्या व्यक्तीने अर्ज केलेला आहे. आयुक्तांनी पाठविलेला नाही साहेबांचे चालले होते की, हा विषय आयुक्तांनी आमच्याकडे कसा पाठविला ? त्यात ज्यांना शिक्षा झाली. त्यांच्या अपिल कर्ज आहे. दुसरा महत्वाचा मुद्दा आहे की, चौकशी अधिकारी कमिशननरने नेमलेले आहेत. त्यांना तो अधिकार आहे. तिसरे महत्वाचे कारण यांना आपण वेळावेळी कळविलेले आहे की, तुमचे काम वॉर्डापूरते चोख करा आणि जी.आर. म्हणतो त्या जी.आर.मध्ये खालची ओळ सर्वांनी वाचली नाही. बांधकामे उभी करण्याची प्रक्रिया चालू असताना अशी बांधकामे पाडण्यास कोणतीही हरकत नाही. म्हणजे पावसाळा चालू असताना निवासी लोकांना हात लावायचा नाही. परंतु, बांधकामे चालू होती. म्हणजे पाडली आणि पुन्हा बांधून रहायला गेली. म्हणजे ती चालू स्थितीतील खालची बांधकामे पाडायला हरकत नाही. म्हणजे नवीन होऊ द्यायची नाही आणि होत असतील तर ती तोडायची.

**रिटा शाह :-**

एक मिनिटचा व्यत्यय आणतो. आपण बोललात की, शिरवळकर साहेबांनी तोडल्यानंतर आम्ही आदेश दिले की, ते परत तोडा आपण किती वेळा त्यांना लेखी आदेश दिलेले आहेत की, बांधून झाले ते तोडा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

दररोज तोडा म्हणून लेखी आदेश देतो का? दररोज सकाळी बोलावून घ्यायचे आणि तोडायचे आणि किती सभा झालेल्या आहेत? सभा घेऊन काय प्रोसीडींग आहे.

**रिटा शाह :-**

साहेब हे सर्व माझ्या समोर झालेले आहे. मी स्वतः तक्रार केली होती. केसरीनाथ म्हात्रेना मी त्या दिवशी झाडले की, तुम्ही इथे बसलेले आहेत आणि तोडत का नाही? आणि तुटलेले आहे. परत इथे बांधून झालेले आहे. केसरीनाथ म्हात्रे बोलले की, मॅडम आता पाठवतो. म्हात्रे साहेबांना स्वतःला माहिती आहे की, ते बांधायचे चालू आहे. हे बोलायला नको म्हणून मी सारखी बोलते की, शिरवळकर दोषी असतील. ते एकटे त्यासाठी जबाबदार नाहीत. सर्व त्याला जबाबदार आहेत. पण ते केसरीनाथ म्हात्रेना माहिती नाही आणि त्यांनी निदर्शनात आपणले नाही. ते चुकीचे बोलतात. कारण माझ्यासमोरची गोष्ट आहे मी कुठल्याही कोर्टात स्टेटमेन्ट दयायला तयार आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

विषय या बांधकामाविषयी चाललेला आहे.

**रिटा शाह :-**

ह्याच बांधकामासाठी मी बोलते. पंधरा गाळयाचे हे बांधकाम चाललेले त्यासाठीच मी बोलते मी म्हात्रे साहेबांकडे तिसऱ्या माळयावर गेली होती. जेव्हा तो ऑफीसमध्ये बसत होते त्यावेळी ते अतिक्रमण विभागाचे मुख्य अधिकारी होते. तेव्हा मी गेली होती. माझ्यासमोर ते झाले होत आणि शिरवळकर साहेबांली तिथे येऊन सांगितले की, साहेब सन्मा. सदस्या रिटा शाहची तक्रार आहे आणि ते बांधकाम परत चाललेले आहे. तर ते काय बोलले? ठिक आहे. त्यांना सांगा आम्ही त्यांना तोडायला उद्याच पाठवू आता जूव्हा तुमचा मोठा अधिकारी किंवा अतिक्रमण विभागाचा मोठा अधिकारी खालच्या क्षेत्रीय अधिकाऱ्याला जाऊन सांगणार नाही की, ते परत जाऊन तोड. मी कोणाचा दोष मानत नाही. नियंत्रणचा आपल्याकडे दोष आहे. कुठलीही गोष्ट आणि कुठलीही वास्तु अनधिकृत बांधकामासाठी कुठलाही एक माणूस जबाबदार नाही. हे माझे मत आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

अनधिकृत बांधकामासाठी एक माणूस जबाबदार नाही. सगळेच जबाबदार आहेत. नुसते कर्मचारीच जबाबदार नाहीत. आणि हे आत्मपरिक्षण करून बघा की, आतापर्यंत जी बांधकामे झाली आणि होतात याला व्यक्तिशा आपले आत्मपरिक्षण तपासून बघा की, एक तोडायला गले तर दहा जण तोडू नका बोलतात. म्हणजे या परिस्थितीतसुध्दा आम्ही तोडत असतो. याचा असा अर्थ नाही की, एक सदस्य तोडायलाच पाहिजे म्हणतात आणि बाकीचे सुध्दा तोडा म्हणतात असे नाही. नुसता कर्मचारीच याला जबाबदार नाही आहे. त्याला सगळेच जबाबदार आहेत.

**रिटा शाह :-**

साहेब, तुम्ही जे बोलता तेच मी बोलते. आपले नियंत्रण नाही. एकटे शिरवळकर या गाष्टीसाठी जबाबदार नाही. मी पण हेच तुम्हाला सांगते मलाही आत्मपरिक्षण करायचे आहे की, आपण कुठे

चुकलो आणि आपण चुकतो कारण कुठलेही अनधिकृत बांधकाम नगरसेवकाच्या तक्रारीवर तुटत नाही. एखाद्या साध्या संस्थेच्या नावावर तुटले आणि तुटल्यानंतर एवढा मोठा गाजावाजा झाला.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

नगरसेवकांच्या अर्जावर कधीच तुटले नाही.

**रिटा शाह :-**

तुटले आहे. माझे एकटीचे हे नाही आहे. आता सन्मा. सदस्य चंद्रकांत वैतीसाहेबांना देखील तोच मुद्दा उभारला प्रश्न तो नाही. नगरसेवकांनी केलेल्या तक्रारीवर काहीतरी गाजावाजा झाला असता तर समजले असते.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

यादीनिशी करू यापूर्वीचा इतिहास काढून बघितला आणि आता बघितला तर पूर्वी जे आपल्याकडे तीस चाळीस लाखाचे डेव्हलपमेन्ट चार्जेस वसुल होत होते. त्यावेळी परवानगी मागणाऱ्यांची संख्या कमी होती आपल्याकडे आता साडे सात-आठ कोटी डेव्हलपमेन्ट चार्जेस वसुल होतात. याचा अर्थ अनधिकृतपणे होत असतील, होत नाही असे नाही. आता कुणीही देव बसला तरी अनधिकृत संपणार नाही आहे. कुठे ना कुठे चालू राहणार. पंरतू ज्या मोठया प्रमाणात चालू होत्या त्या कट्रोल केला याचा अर्थ आठ कोटी रूपये डेव्हलपमेन्ट दरवर्षी वसूल होतात. पूर्वी जे टोटली परवानगी न घेता बांधत होते. आता परवानगी मागणाऱ्यांची संख्या कमी होती. आता परवानगी मागणाऱ्यांची संख्या वाढल्यामुळे डेव्हलपमेन्ट चार्जेस आठ कोटी वसूल होतात. पूर्वी जे डेव्हलपमेन्ट चार्जेस तीस चाळीस लाखाची वसूली व्हायची म्हणजे त्यावेळेला परवानगी मागणाऱ्यांची संख्या कमी होती. आता आठ कोटी रूपये डेव्हलमपमेन्ट चार्जेस वसूल होतात. याचा अर्थ परवानगी मागणाऱ्यांची संख्या वाढली. माझ्या निवेदनाचा असा अर्थ नाही की, पूर्णपणे अनधिकृत बांधकाम थांबलेले आहे. असे माझे मुळीच म्हणणे नाही. पंरतु कंट्रोल झाले हे माझे म्हणणे आहे आणि कुणीही देव बसला म्हणजे कुणीही कडक अधिकारी आला तरी अनधिकृत संपलेले आहेत असा विषय नाही. सगळीकडे चालू आहेत. परंतु जास्तीत जास्त किती कंट्रोल केला हा महत्वाचा विषय आहे.

**रिटा शाह :-**

साहेब बोलतात ते योग्य बोलतात.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

त्यामुळे साहेबांना जी दर्शविलेली शिक्षा आहे ती योग्य आहे.

**मोहन पाटील :-**

एखादा अधिकारी अपिलात गेलेला आहे आणि अपिलात गेलेल्या अधिकाऱ्याने आपल्याकडे विषय आणलेला आहे. त्या विषयी तुम्ही बोला अनधिकृत विषयाला आपण सपोर्ट करतो हा विषय नाही आहे. अतिक्रमणाच्या माध्यमातून या अधिकाऱ्यावर कारवाई करावी अशा पध्दतीचा विषय आहे आणि तो विषय आपल्याकडे अपिलामध्ये आलेला आहे. त्यात निर्णय दिलेला आहे. तो निर्णय मान्य नाही आहे. अतिक्रमणाचा विषय बोलले गेल्यानंतर ज्या पध्दतीने बोललात त्या पध्दतीने जसे अतिक्रमण संपणार नाही. तसा हा विषय हा संपणार नाही आहे. पंरतु मला याठिकाणी असे बोलायचे आहे की, एखाद्या अधिकाऱ्यांनी जी चुक कलेली आहे किंवा त्यांच्याकडून चुक झालेली आहे. तर कोणत्या चुकीला ३०२ ची फाशी दिली पाहिजे. कोणत्या चुकीला त्याला तडीपार केला पाहिजे. कोणत्या चुकीला त्याला सहा महिन्याची शिक्षा दिली पाहिजे याच्यावर विचार केला जातो. कारण संपूर्णपणे सर्वस्वी जबाबदारी त्या अधिकाऱ्याची होती. असा विषय होत नाही आहे. कारण प्रशासनामध्ये काम करताना वरच्या अधिकाऱ्यांनी त्याला ज्या ज्या वेळेला आदेश दिले त्या आदेशाप्रमाणे तो काम करतो. ते काम करीत असताना त्याने जर कामामध्ये थोडीशी दिरंगाई दाखविली तर त्याच्यावर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. कायद्याचा बडगा त्याच्यावर बसला पाहिजे असे प्रशासनाचे मत आहे आणि त्या मताशी आम्ही पूर्णपणे सहमत आहोत. आम्ही सहमत नाही आहोत. आम्हाला अतिक्रमण या विषयावर समर्थन या ठिकाणी करायचे नाही. कारण हा विषय अतिक्रमणाच्या माध्यमातून या ठिकाणी आलेला आहे. अतिक्रमण वेळेवर तोडले नाही की अतिक्रमण होत होते की, त्याच्या लक्षात येऊन तुम्ही तोडले नाही. तुम्ही ऑर्डर दिली पण तोडले नाही. म्हणून हा विषय आलेला आहे. पंरतु ज्या पध्दतीने त्याची चौकशी केलेली आहे त्या चौकशी अंती असे दिसून येते की, वनसाईड चौकशी झालेली आहे. असे त्यांच्या अपिलाचे म्हणणे आहे आणि जेव्हा एखाद्या अपिलाने या ठिकाणी अपिल केल्यानंतर सभापती साहेब या ठिकाणी सोळा सदस्य आणि अधिकारी वर्ग बसलेले आहेत. मला असे बोलायचे आहे की, त्याना शिक्षा

झाली पाहिजे. असे प्रशासनाचे म्हणणे आहे आमचे म्हणणे नाही आहे. पण जे अतिक्रमण जे होत आहे. त्याला आम्हाला दुजोरा दयायचा नाही किंवा समर्थन करायचे नाही. पंरतु, जया अधिकाऱ्याकडून कामचुकारपणा झालेला आहे. तर तयासाठी आपण नॉमिनल म्हणून त्याचे इन्क्रीमेन्ट स्टॉप करावे आणि त्याला आपण पुढे संधी द्यावी आणि या शहरामध्ये अशा पध्दतीचे अतिक्रमण होऊ नये आणि अधिकाऱ्यांकडून चांगल्या पध्दतीने काम झाले पाहिजे, अशा पध्दतीचे प्रशासनाने लक्ष घालून यापुढे काम केल पाहिजे. अशा पध्दतीचा मी या ठिकाणी ठराव मांडत आहे.

**याकुब कुरेशी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मला वाटते या ठरावामध्ये जेव्हा आपण हा सगळा विषय घेतला. सेक्शन ३ दिलेले आहे. या ३ सेक्शनमध्ये सचोटी, कर्तव्यपाराणता इत्यादी राखण्याचे शासकीय कर्मचाऱ्याचे कर्तव्य आता मी जे मघाशी परिपत्रक सांगितले. मी मघाशी सांगितलेल्या शेवटच्या ओळी वाचा. यामध्ये असे लिहीले आहे की, अतिक्रमण होत असलेली बांधकामे पावसाळयात काढण्यात यावीत आता आपण जर सेक्शन (३) शिरवळकरांना लावले तर मग तो सगळयांना लागेल. तो तुमच्या सेक्शन (३) काय म्हणतो? बघा, आपण याच्यावर निर्णय घेतो हा निर्णय म्हणजे कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे सभापती आपण हा ठराव दयाल. किंवा निर्णय द्याल. आपल्याला याच्यावर ठराव दयायचा नाही आहे. आदेश द्यायचा आहे. सेक्शनमध्ये आपल्याला आदेश म्हणून दिलेला आहे आदेश असा शब्द आहे. आयुक्तांनी टिपणी किंवा गोषवारा इथे पाठविला आहे. याच्यामध्ये खाली असा शब्द आहे ५६(२) खंड २(ब) नुसार लावलेली शास्ती योग्य आहे व ती कायम ठेवण्यास शिफारस आहे. म्हणजे आयुक्त म्हणतात की, ती शास्ती योग्य आहे म्हणजे तुम्ही निर्णय घ्यायचा नाही. पण सेक्शनमध्ये निर्णय हा शब्द आहे. आदेश हा शब्द आहे. आयुक्तांनी त्यांच्या टिपणीमध्ये आदेश हा शब्द लिहिला पाहिजे.

**मा. सभापती :-**

त्यांनी अपिल केला आहे. त्या अपिलवर आपण जाऊ.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

अपिल केल्याची.

**मिलन म्हात्रे :-**

तसे नाही. हा जो गोषवारा आहे. हा सभेला आला ह्याच्यामध्ये जे आदेशाचे डेफिनेशन आहे ते याच्यामध्ये रिफ्लेक्ट झाले पाहिजे. आयुक्तांनी आपल्या आदेशाची आपल्याला मागणी केली पाहिजे की, आपले आदेश प्राप्त व्हावेत कारण अपिलावर कॉम्पीटन्ट ॲथोरिटी तुम्ही आहात.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब तुम्हाला थोडेसे सांगतो, हा जो विषय आलेला आहे. हा असा विषय आहे की, अर्जदाराने अर्ज केल्यानंतर त्याच्यावर मग अतिक्रमण अधिकारी नाईक साहेब, आयुक्त शिंदे साहेब यांनी जो अधिकारी रायकरसाहेब नेमला. त्याने चौकशी प्रोसेसमध्ये आल्यानंतर निर्णयाप्रत जेव्हा प्रकरण आले. तेव्हा सदर कर्मचारी वासुदेव शिरवळकर यांनी स्थायी समितीला अपिल केले आहे. स्थायी समिती ही आयुक्तांची निकट वरिष्ठ अधिकारी मानली जाते. अशी ॲक्टमध्ये प्रोव्हिजन आहे. आयुक्तांनी हे आपल्याला दिलेले नाही. तर हे अपिल शिरवळकरांचे स्थायी समितीला आलेले आहे आणि स्थायी समितीला हे अपिल आल्यामुळे आयुक्तांचे याच्यामध्ये अजूनपर्यंत त्यांनी तसे आदेश दिले नाहीत. निकट वरिष्ठ अधिकारी स्थायी समिती आहे. मग निकट वरिष्ठ अधिकारी स्थायी समिती हा निर्णय घेऊन आयुक्तांना तशा त्यांच्या ज्या भावना आपल्याकडे आल्या आपल्याकडे जे अपिल आले. त्या अपिलाच्या माध्यमातून त्यांनी आपल्याकडे न्याय मागितला आहे. आणि हा न्याय देण्यासाठी स्थायी समिती तशा प्रकारची शिफारस करणार आणि त्यानंतर तसा निर्णय होणार म्हणजे आयुक्तांनी आपल्याला अजूनपर्यंत या प्रकरणात कशी काय माहिती दिली? त्याचा अपिल आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सभापती साहेब, सभागृहाला एक बाब आम्ही निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेबांनी सर्क्युलर वाचले. पंरतु, पावसाळयामध्ये जी बांधकामे होतात त्यासाठी ते सर्क्युलर लागू आहे. या केसला हे प्रकरण लागू होत नाही. कारण की हे बांधकाम मार्च आणि एप्रिलमध्ये हे बांधकाम पूर्ण झालेले आहे. सव्वीस चाळीचे बांधकाम होते. सव्वीसपैकी फक्त पंधरा चाळी शिल्लक ठेवल्या आणि इतर चाळी तोडल्या.

**मिलन म्हात्रे :-**

केळकर साहेब, आपण सभागृहात वक्तव्य करता. तारखेच्या नीट नोंदी ठेवा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

त्यामुळे जर तिवारीसाहेबांचे परिपत्रक गैर लागू आहे. पावसाळयाकरिता परिपत्रक वाचून दाखविले ते या केसमध्ये गैर लागू आहे आणि प्रशासनाने केलेली कारवाई योग्य अशी आहे. त्यामुळे त्यांना संधी देण्यात आलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

केळकर साहेब, लागू कसे होत नाही? तुमच्या नोटिसा आणि तुमच्या तारखा कुठे आहेत? सातवा महिना पावसाळयामध्ये येतो. तुम्ही काय सांगता? त्यांच्या पत्रात दिलेले आहे. सातव्या महिन्यात दिले आहे. ते मिस गाईड काय करतात? हे काय सातव्या महिन्यात लिहिलेले आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

सातव्या महिन्यामध्ये एकाची तक्रार आलेली आहे. त्यातील फक्त पंधरा शिल्लक ठेवले.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही पहिले बांधकाम मे महिन्यामध्ये पाडले. सभापतीसाहेब यांच्यावर जरा गांभीर्याने विचार करा पहिले बांधकाम ९ मेला पाडले गेले. सन्मा. सदस्य चंद्रकांत वैतीसाहेब जरा समजून घ्या. कुठल्याही अधिका-याने मिसगाईड केले ते ऐकून घेऊ नका माझ्याकडे तारीख आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

जे काही कागदपत्रावर आहे. तेच आम्ही वाचून दाखविले आहे.

**चंद्रकांत वैती :-**

नाईक साहेब, मिसगाईड हा शब्द तारखेला अनुसरून वापरला गेला.

**मा. सभापती :-**

श्री. वासुदेव शिरवळकर यांची सेवा ज्येष्ठता शैक्षणिक पात्रतेनुसार पदोन्नती थांबवू नये. त्याना उपरोक्त प्रकरणाची म्हणून दोन वेतनवाढी थांबवाव्या असा मी आदेश करतो.

**चंद्रकांत वैती :-**

हा आदेश झालेला आहे. पण दुसरे एक असे सांगतो की, ज्या व्यक्तिने हा अर्ज केला होता त्या व्यक्तिने संबंधित अधिका-याची म्हणजे त्यावेळचे क्षेत्रीय अधिकारी शिरवळकर यांची बदली करावी आणि सोबत राकेश दुबे जो बांधकाम व्यावसायिक होता. त्याच्यावर एम.आर.टी.पी. दाखल करावे. ती दाखल केली नसेल ती त्यांची मागणी आहे. त्या मागणीला अनुसरून ती एकदा सोपस्कर पार पाडून घ्यावी.

**मिलन म्हात्रे :-**

केळकर साहेब, आपण मघाशी बोललात ते हे सगळे प्रकरण मे ते सप्टेंबरच्या आतील आहे. त्या परिपत्रकामध्ये जो कालावधी दिला आहे. त्याच्या आतील हे प्रकरण आहे. त्यामुळे तुम्ही जे बोलता लागू होत नाही. हे होऊ शकत नाही. सगळया तारखा आहेत. तुमच्याच नोटिशीमध्ये तारखा आहेत. तुमच्याच सहीच्या तारखा आहेत. वाचून दाखवू का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

मार्च आणि एप्रिल, मे मध्ये बांधकाम झालेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हे बघा मे पहिले बांधकाम तोडले जूनमध्ये नवीन झाले. ऑगस्टला त्या तक्रारदाराची पहिली नोटिस आहे. हा तीन महिन्याचा पिरिएड महत्वाचा आहे.

**याकुब कुरेशी :-**

सभापती साहेब, याच्यावर निर्णय झालेला आहे. उगाच वादविवाद करण्यात अर्थ नाही.

**प्रकरण क्र. ४२:-**

श्री. वासुदेव शिरवळकर यांचे अपिल अर्जाबाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र. ५० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे कर्मचारी श्री. वासुदेव विष्णु शिरवळकर (कर निरिक्षक) यांना तत्कालीन नगरपालिकेने मिरा ते चेना या विभागात अनधिकृत बांधकामावर नियंत्रण रहावे या करिता प्रभारी क्षेत्रीय अधिकारी म्हणून कर निरिक्षकाचे कामकाज सांभाळून अतिरिक्त पदभार परिपत्रक क्र. जीईएन/१०९६/४५/प्र.क्र.१५/नवि-२७, दि. ०४/०३/१९९६ अंतर्गत तरतूदीनुसार अनधिकृत बांधकाम व

अतिक्रमणे हटविणे व नियंत्रण ठेवण्याचे उद्देशाने नेमणूक केली होती. परंतु त्यांनी सदर काम करीत असतांना त्यांना नेमुन दिलेल्या प्रभागांतील पेणकरपाडा येथील दत्त मंदिराच्या मागील प्रभागात २६ खोल्यांचे अनधिकृत बांधकाम झाले होते. त्यापैकी १५ खोल्यांचे बांधकाम दि. ०९/०५/२००३ रोजी श्री. वासुदेव विष्णु शिरवळकर यांनी जे.सी.बी. मशिनद्वारे पाडून टाकले होते. परंतु त्यानंतर दि. ०९/०५/२००३ ते १८/०८/२०३ या कालावधीत त्यांनी पुन्हा त्या ठिकाणी अनधिकृतपणे बांधकाम होत आहे का हे पहाणे त्यांचे प्रभाग क्षेत्रीय अधिकारी म्हणून कर्तव्य होते. परंतु त्यांनी त्यात कसुर केली असल्याबाबत दि. १८/०८/२००३ रोजी श्री. सोमनाथ वाघमारे (विशेष कार्यकारी अधिकारी) भारतीय बहुजन महासंघ यांचा तक्रार अर्ज कार्यालयात प्राप्त झाला. त्या तक्रार अर्जानुसार अतिक्रमण विभागाचे प्रमुख श्री. केसरीनाथ म्हात्रे (मुख्य लिपीक) यांनी तक्रारीवरुन पाहणी केली असता, दि. ०९/०५/२००३ रोजी पाडण्यांत आलेले १५ खोल्यांचे बांकधम पुन्हा करण्यांत येऊन ते रहिवास व्याप्त असल्याचा अहवाल सादर केला. म्हणजे त्या अनधिकृत बांधकामास त्या प्रभागाचे प्रभारी क्षेत्रिय अधिकारी म्हणून श्री. वासुदेव विष्णु शिरवळकर हेच जबाबदार असल्याचे प्रशासनाचे मत होऊन प्रथम त्यांना मनपा/आस्था/७०९/५१०७/२००३-०४, दिनांक ३०/०८/२००३ ने कारणे दाखवा नोटीस बजावण्यांत आली. त्या नोटीसीचा दि. ०५/०९/२००३ रोजी खुलासा केला आहे. परंतु सदर कारणे दाखवा नोटीशीचा खुलासा असमाधानकारक वाटल्याने त्याची मनपा/आस्था/११४४/६५४५/२००३-०४, दिनांक २२/१०/२००४ चे ज्ञापनाद्वारे त्याचे विरुद्ध विभागीय चौकशी करण्याचे प्रस्तावित करुन त्यांची चौकशी श्री. अ. वा. रायकर (सेवानिवृत्त अप्पर जिल्हाधिकारी) यांचेमार्फत करण्याचे ठरविण्यांत येऊन श्री. अ. वा. रायकर यांनी श्री. वासुदेव विष्णु शिरवळकर, प्रभारी क्षेत्रीय अधिकारी, अतिक्रमण विभाग यांची रितसर चौकशी करुन दि. १०/०३/२००४ रोजी चौकशी अहवाल सादर केला आहे. त्या चौकशी अहवालात त्यांचेवर दि. २२/१०/२००३ रोजीचे ज्ञापनासोबत जोडण्यांत आलेल्या जोडपत्रामधील दोषारोप क्र. १ ते ३ मध्ये ते दोषी असल्याचा चौकशी अधिका-यांनी काढलेल्या निष्कर्षास प्रशासन ठाम असून श्री. वासुदेव विष्णु शिरवळकर यांनी शासन निर्णय दि. ०४/०३/१९९६ अंतर्गत तरतुदींचा भंग केलेला असून त्यांनी नेमून दिलेल्या कामात कसुर केली आहे. याबाबत प्रशासनाने लादलेली शास्ती ही फारच कठोर असून सदर लादण्यांत आलेल्या शास्ती ऐवजी ही सभा श्री. वासुदेव विष्णु शिरवळकर यांच्या केलेल्या अपिलावर विचार विनिमय करुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(४) नुसार सभेस प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन श्री. वासुदेव विष्णु शिरवळकर यांची एक वेतनवाढ दोन वर्षाकरिता तात्पुरत्या स्वरुपात भविष्यातील वेतनवाढीवर परिणाम न होता रोखून धरण्यांस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. याकुब कुरेशी.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ०१.१५ वा.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**